संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी,
वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com


* वर्ष ५१ * अंक २६२ * * अकोला * बुधवार, दिनांक १९ मार्च २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

।। परमात्मा एक ।।
मानव इंटरप्रायजेस मोबाईल शॉप
टि.व्ही. फ्रिज, वॉशिंग मशीन, मोबाईल रिचार्ज


7020267005 गजानन देशमुख 9284478885 सिद्धांत देशमुख
प्लॉट नं. ११, दुर्गा नगर, भरतवाडा, नागपूर-०४

## १५० पेक्षा अधिक लोकांवर गुन्हे : अनेकांना अटक : काही भागात संचारबंदी

# शहरात तणावपूर्ण शांतता



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
सोमवारी महाल परिसरात औरंगजेबची प्रतिकात्मक कबर जाळल्यानंतर दोन गटात संघर्ष पेटला. यात दोन्ही गटातील युवकांनी एकमेकावर दगडफेक केली. पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी नागपुरातील अर्ध्या अधिक भागात संचारबंदी जाहीर केली आहे. शहरात सध्या तणावपूर्ण शांतता असल्याची स्थिती आहे.

शहरातील कोतवाली तहसील, लकडगंज, नंदनवन, सदर, महाल यासह अन्य परिसरात पोलिसांचा मोठा ताफा तैनात आहे. या परिसराकडे येणाऱ्या प्रत्येक वाहनाची तपासणी सुरू असून संशयित व्यक्तीला सुद्धा ताब्यात घेऊन चौकशी करण्यात येत आहे.

महाल, इतवारी लकडगंज, कोतवाली या परिसरातील बाजारपेठा कडे जाणाऱ्या सर्वच रस्त्यावर पोलिसांनी बॅरिकेडिंग केली आहे. गांधी गेट, महाल चिटणीस पार्क चौक यासह अन्य भागात पोलिसांनी मोठ्या प्रमाणात सशस्त्र जवानाना तैनात केले आहे. सोमवारी उसळलेल्या हिंसाचाराचे पडसाद संपूर्ण शहरभर दिसत असून सध्या शहरात तणावपूर्ण शांततेचे वातावरण आहे.

अशोक चौकापासून ते इतवारी पर्यंत तसेच महाल पासून तर शुक्रवारी तलावापर्यंत चा रस्ते सूनसान होते. रस्त्यावर एकही वाहन दिसत नव्हते. या भागातील प्रत्येक रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पोलिसांची गर्दी दिसत आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. याप्रकरणी पोलिसांनी १५० पेक्षा अधिक लोकांवर गुन्हे दाखल करून अटक केली आहे.

### हिंसाचार करणाऱ्यांची गय नाही... पोलीस आयुक्त

नागपूरच्या महालमधील झेंडा चौकात दोन गटांत झालेल्या संघर्षानंतर काल मोठी जाळपोळ आणि गाड्यांची तोडफोड झाली होती. यावेळी जमावाल पांगवताना एका गटातील लोकांनी पोलिसांवर दगडफेक केली. प्रत्युत्तरात पोलिसांनीही त्या गटावर अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडून जमाव पांगवला. दरम्यान या घटनेत काही पोलीस कर्मचारीही जखमी झाले आहेत.

नागपूरमध्ये काल झालेल्या हिंसाचारानंतर शहरात सध्या काय परिस्थिती आहे, याबद्दल नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंघल यांनी माहिती दिली आहे. ते म्हणाले, नागपूरमध्ये परिस्थिती नियंत्रणात असून शहरात सध्या शांतता आहे. या हिंसाचाराप्रकरणी आम्ही ५० हून अधिक लोकांना ताब्यात घेतले आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांना आम्ही शोधून काढत आहोत.

डॉ. रविंदर सिंगल यांनी पुढे सांगितले की, या घटनेत ३३ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. पोलिसांनी चांगले काम केले आहे. हिंसाचार करणाऱ्यांची ओळख पटवली जात असून, त्यांच्यावर कारवाई सुरू केली आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर सर्व संबंधित कलमे लागू केली जाणार आहेत. नागपुरात पोलीस आणि इतर सुरक्षा दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. नागपूरच्या काही भागात संचारबंदी लागू आहे. अशी घटना पुन्हा घडू नये म्हणून संबंधित लोकांसोबत बैठक घेण्यात येणार आहे.

**शाळांना सुट्टी**

घटनेचा परिणाम शहरातील सामान्य जनजीवनावर झालेला आहे. शहराच्या अनेक भागात संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. यासह शहरातील अनेक शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मात्र शिक्षण विभागाकडून शाळांना सुट्टीच्या सार्वजनिक सूचना दुपारपर्यंत गेल्या नव्हत्या.



औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मुद्यावरून नागपुरात सोमवारी रात्री भयंकर दंगल झाली. त्यात अनेक गाड्यांची जाळपोळ करण्यात आली. समाजकंटकांनी तोंडाला स्कार्फ बांधून पोलिस व स्थानिकांवर दगडफेक केल्याचा दावा प्रत्यक्षदर्शींनी केला आहे. समाजकंटकांनी तोंडाला स्कार्फ बांधले होते. त्यांनी पोलिसांवर रस्त्यावरील गट्टूंची दगडफेक केली. यामुळे पोलिसांवरही स्वतःचा बचाव करण्यासाठी लगतच्या घरांमध्ये आश्रय घेण्याची वेळ आली होती.

---

**हिंसाचाराची चौकशी करणार – योगेश कदम**

नागपूरमध्ये झालेल्या हिंसाचारानंतर येथे संचारबंदी लागू करण्यासह रस्ते बंद करण्यात आले आहेत. पोलिसांनी ५० जणांना ताब्यात घेत कारवाई सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची करण्याची ग्वाही दिली आहे.

## अग्राग्रलेख
## खरीखरी..
## काँग्रेसपुढील यक्षप्रश्न

परवा राहुल गांधी यांनी गुजरातच्या आपल्या कार्यकर्त्यांसमोर भाषण केले. भाषण करताना काँग्रेसच्या नेत्यांमध्ये अनेक लोक भाजप सोबत हातमिळवणी करणारे आहेत. असा आरोप राहुल गांधी यांनी केला. यापूर्वी हा आरोप करणारे काँग्रेसच्या बाहेरचे पण काँग्रेसचे हितचिंतक असलेले अनेक लोक होते. पण राहुल गांधी यांनी असा आरोप करणे अभूतपूर्व आहे. आजच्या घडीला राहुल गांधी काँग्रेसचे अघोषित नेते आहेत. मल्लिकार्जुन खरगे राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष असले तरी राहुल गांधी काय बोलतील किंवा त्यांचे विचार कोणते आहेत. यावरूनच त्यांची भाषा उच्चारली जाते. सोनिया गांधी यांनी आता जवळजवळ निवृत्तीच घेतलेली आहे. त्यांच्या ऐवजी प्रियंका गांधी सध्या अधिक कार्यरत आहेत खासदार झाल्यावर तर त्यांच्या नेतृत्व गुणांची प्रचिती सर्वांनाच आलेली आहे. पण काँग्रेसला जो आजार जडलेला आहे. त्याचे औषध कुणाकडेही दिसत नाही. गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी जबरदस्त प्रचार यंत्रणा राबवली. त्यामुळे काँग्रेसला शंभर जागा जिंकता आल्या. पण ज्याप्रमाणे एनडीए मधील दादागिरी मोदी आणि शहा यांच्याकडेच आहे. तशी स्थिती इंडियात आहे काय. इंडियातील अनेक घटक पक्षांना काँग्रेस म्हणजे अडथळा वाटतो. दुसरे म्हणजे पश्चिम बंगालच्या बाहेर कोणीही विचारत नसले. तरी ममता बाईंना इंडियाची नेतृत्व आपल्याकडे यावे असे वाटते. तिसरी गोष्ट म्हणजे इंडिया आघाडीतील आम आदमी पार्टीने काँग्रेसला हरवण्यासाठी अनेक राज्यात आपले उमेदवार मोठ्या संख्येने उभे केलेले होते. गुजरात आणि हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या पराभवाचे विश्लेषण केल्यावर, काँग्रेससाठी आम आदमी पार्टी खलनायकी भूमिकेतच दिसून आली. उत्तर प्रदेश आणि बिहार मधील यादव कंपनीचे अजूनही तळ्यात-मळ्यात सुरू आहे. राहुल गांधी लोकसभेत विरोधी पक्षनेते आहेत. पण त्यांचे नेतृत्व सर्व घटक पक्षांना मान्य आहे काय, हा सुद्धा मोठा यक्षप्रश्न आहे. आताच्या घडीलाही काँग्रेस पक्षाकडे जवळ जवळ 20% मते आहेत. त्यातही थोडाफार फरक होत असेल. तरीही 20% मते म्हणजे काही कमी नसतात. 1984 च्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर झालेल्या मतदानामध्ये काँग्रेसने 48% पेक्षा जास्त मते मिळवली होती. लोकसभेच्या जवळपास सव्वा चारशे जागांवर काँग्रेसचे खासदार होते. त्यावेळी भारतीय जनता पक्षाजवळ केवळ दोन खासदार होते. त्यानंतर भारतीय जनता पक्षाने हिंदुत्व, राम मंदिर, वगैरेंसारखे जनमानसाच्या हृदयाला भिडणारे विषय घेऊन आपल्या पक्षाच्या विचारांची रणनीती आखली. अटलजींच्या हाती अनेक पक्षांच्या सहमतीने सत्ता आली. 2014 सालामध्ये मात्र भारतीय जनता पक्षाने स्वतःच्या बळावर बहुमत मिळवले आणि आताही काँग्रेसपेक्षा अडीचपट जास्त जागा घेऊन भारतीय जनता पक्ष सत्तेत सत्तारूढ आहे. आता भारतीय जनता पक्षाच्या विचारधारेनंतर काँग्रेसच्या विचारधारेबद्दल चर्चा करणे गरजेचे आहे. लोकशाही, मानवाधिकार, व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि सर्वधर्मसमभाव ही काँग्रेसची घोषित नीती होती. पण 1977 पूर्वी काँग्रेसकडे जे जनतेचे समर्थन होते. ते पुढे अनेक वेळा डगमगू लागलेले होते. आता तर काँग्रेस मधील बडेबडे नेते भाजप शरण झालेले आहेत. काही उघडपणे तर काही काँग्रेस पक्षात राहूनही राहुल गांधी म्हणतात, त्याप्रमाणे भाजपा बरोबर हातमिळवणी किंवा मानसिक मित्रता ठेवतात. त्यामुळेच काँग्रेसला स्वबळावर उठून उभे राहायचे असेल. तर खालपासून वरपर्यंत संपूर्ण परिवर्तन करावे लागेल. जयप्रकाश नारायण यांनीही आणीबाणीच्या काळात संपूर्ण क्रांतीचा नारा दिला होता. पण त्यांचे प्रयत्न सुद्धा अल्पकालीनच ठरले. केवळ अडीच वर्षातच जनता सरकार पडले आणि काँग्रेसने पुन्हा आपले सरकार निवडून आणले. पण आता पुढील महिन्यात काँग्रेसचे अधिवेशन गुजरात मध्ये होत आहे. त्या अधिवेशनात काँग्रेसला स्वतःला बदलविण्यासाठी जे उपाय करायचे आहेत. ते करण्यासाठी काँग्रेसची तयारी आहे काय, भारतीय जनता पक्षाच्या रणनीतीला आणि धनशक्तीला पुरून उरेल असे काँग्रेस जवळ काय आहे. यामुळेच आता तरी काँग्रेस वर्किंग कमिटीने कितीही गमजा केल्या तरी स्वबळावर सत्ता मिळणे अशक्य आहे. संपूर्ण गांधी परिवाराला आता राहुल गांधी यांच्याप्रमाणेच जनतेत मिसळावे लागेल. नवे नेतृत्व उभे करावे लागेल. जागोजागी नव्या नेतृत्वाच्या फळीला चालना द्यावी लागेल. पक्षातील घोषित किंवा अघोषित मठाधीशांना दूर सारावे लागेल. पण हे शक्य होईल काय, हाच काँग्रेसचा समोरचा यक्षप्रश्न आहे. एकूणच दीड शतकाच्या जवळपास जिवंत असलेल्या काँग्रेसला यापुढे सत्ताप्राप्ती न झाल्यास मोठा बाका प्रसंग उद्भवू शकतो. गांधी बंधू-भगिनींनी या धोक्याकडे गंभीरतेने लक्ष दिले पाहिजे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## नागपूर दंगलीत सुनियोजित पॅटर्न
### मुख्यमंत्री फडणवीसांचे विधानसभेत निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :
सोमवारी नागपूरमध्ये झालेल्या दंगलीत अनेक वाहनांची जाळपोळ करण्यात आली. दंगलीत तब्बल ३३ पोलीस जखमी झाले असून त्यात तीन डीसीपी दर्जाचेअधिकारी असल्याची बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आज यासंदर्भात विधानसभेत केलेल्या निवेदनात अधोरेखित केली. नागपूरमध्ये घडलेल्या दंगलीमध्ये एक सुनियोजित पॅटर्न दिसून येत असल्याचे सूचक विधान देवेंद्र फडणवीसांनी केले.

नागपूर दंगलीमध्ये तीन डीसीपी जखमी झाले असून त्यातील एकावर चक्क कुऱ्हाडीने वार करण्यात आले.पोलिसांवर हल्ला करणारे जे कुणी असतील, त्यांना सोडणार नाही, असे देवेंद्र फडणवीस विधानसभेत म्हणाले.

या घटनेत एक क्रेन, दोन जेसीबी व काही चारचाकी वाहने जाळण्यात आली. या संपूर्ण घटनेत ३३ पोलीस जखमी झाले आहेत. ५ नागरिक जखमी झाले आहेत. तिघांवर उपचार करुन घरी सोडण्यात आले आहे. दोन रुग्णालयात आहेत. त्यापैकी एक आयसीयूत आहे, अशी माहिती फडणवीसांनी दिली.

तीन गुन्हे गणेशपेठ पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत. तहसील पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आलेत. ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. एंट्री पॉइंटवर नाकाबंदी करण्यात आली आहे. त्यात तहसील, कोतवाली, गणेशपेठ, पाचपावली, लकडगंज, शांतीनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामवाडा, यशोदरानगर, कपिलनगर या पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. एसआरपीएफच्या पाच तुकड्या इथे तैनात करण्यात आल्या आहेत, असंही फडणवीसांनी नमूद केले.

**पूर्वनियोजित कट?**

नागपूरमधील प्रकार हा सुनियोजित पद्धतीने घडल्याचा दावा देवेंद्र फडणवीसांनी यावेळी केला. सकाळची एक घटना घडल्यानंतर पूर्णपणे शांतता होती. त्यानंतर संध्याकाळी काही लोकांनी जाणीवपूर्वक असा हल्ला केला. एक ट्रॉलीभरून दगड सापडले आहेत. काही लोकांनी घरांवर जमा करून ठेवलेले दगड पाहायला मिळाले. शस्त्रंही मोठ्या प्रमाणावर जप्त करण्यात आली आहे. वाहनांची जाळपोळ झाली आहे. ठरवून काही ठराविक घरांना, आस्थापनांना लक्ष्य करण्यात आलं आहे. त्यामुळे यात काही लोकांचा सुनियोजित पॅटर्न दिसतोयह्व, असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

**अशा लोकांवर कारवाई**

कोणत्याही परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था हाती घेण्याची कुणालाही परवानगी दिली जाणार नाही. पोलिसांवर ज्यांनी कुणी हल्ला केला असेल, त्यांना काहीही झालं तरी सोडलं जाणार नाही. पोलिसांवरचा हल्ला सहन केला जाणार नाही. पोलिसांवर केलेला हल्ला चुकीचा आहे, अशा लोकांवर कठोर कारवाई करू, असे फडणवीस म्हणाले.

### औरंगजेबाची कबर हटवण्यासाठी शिवसेना आमदारांचे
## विधानभवनात आक्रमक आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :
औरंगजेबाच्या कबरीविरोधात आज शिवसेना आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आक्रमक आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी केली. औरंग्याचा धिक्कार करीत त्याची कबर तातडीने हटवण्याची मागणी आमदारांनी केली.




या आंदोलनात मंत्री भरत गोगावले, मंत्री प्रकाश आबिटकर, आमदार विजय शिवतारे, आमदार संतोष बांगर, आमदार डॉ. मनीषा कायंदे, आमदार संजय गायकवाड यांच्यासह शिवसेनेचे अनेक आमदार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

औरंग्याची कबर हटवून तिथे केवळ थडगं ठेवा आणि त्या थडग्याजवळ चार जोडे ठेवा, जेणेकरून येणारे-जाणारे त्या थडग्याला जोडे मारतील, अशी तीव्र टीका मंत्री भरत गोगावले यांनी केली. औरंग्याचे उदात्तीकरण करणाऱ्यांना हिंदुस्थानात राहण्याचा अधिकार नाही, असे संतोष बांगर म्हणाले.

### घटनेचा मोरक्या कोण?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :
भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर दंगलीवर प्रतिक्रिया दिली आहे.

बावनकुळे यांनी विमानतळावर प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी नागपूरमध्ये झालेल्या दंगलीवर खेद व्यक्त करत ४८ वाहनांची तोडफोड झाल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच या घटनेमागे मोरक्या कोण? त्याला शोधून काढू असेही सांगितले.

औरंगजेबाच्या कबरीवरून नागपुरात सुरू झालेला वाद हा दंगलीपर्यंत गेला आहे. त्यानंतर भाजपचे आमदार प्रवीण दटके यांनी पोलिसांवरच आरोप केला आहे. पोलीस उशीर पोहचल्याने हा सगळा प्रकार घडला असेही ते म्हणाले होते.

नागपूरमध्ये जी घटना झाली त्यामध्ये पोलिसांनाही मारहाण झाली आहे. ४८ वाहनांची तोडफोड झाली. शहर शांत ठेवणे आणि समाज माध्यमांवर चुकीच्या बातम्या, अफवा पसरवणे सगळ्यांनी थांबवावे. आम्ही प्रत्येक समाज माध्यमावरील खात्यावर लक्ष ठेऊन आहोत. काहींना ट्रॅक केले जात आहे. काही भागात संचारबंदी लावण्यात आली आहे, सध्या सरकारची भूमिका एवढीच आहे की, हिंदू- मुस्लिम आम्ही एकत्र राहतो. अशी घटना शहरात कधीच घडली नव्हती. ज्यांनी ही घटना घडवण्याचा प्रकार केला त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

### कोकाटेंना तूर्तास दिलासा



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :
कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून तूर्तास दिलासा देण्यात आला आहे. नाशिक कोर्टाच्या आदेशाला तातडीची स्थगिती देण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला. तसेच प्रकरणाची सुनावणी २१ एप्रिलपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. शिवाय सर्व प्रतिवादींना नोटीसही जारी केली आहे. त्यामुळे कोकाटेंना हा तूर्त दिलासा मिळाला असला, तरी सुनावणी पूर्ण होईपर्यंत त्यांच्यावर टांगती तलवार राहणार असल्याचे म्हटले जात आहे.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने एका प्रकरणात २ वर्षे कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेसाठी कोकाटे यांनी जिल्हा सत्र न्यायालयात आवाहन दिले होते.

त्यावर जिल्हा सत्र न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती दिली होती. कोकाटे यांना शिक्षा दिली तर त्यांच्या विधानसभा मतदारसंघाची निवडणूक पुन्हा घेण्याची वेळ येईल आणि जनतेचा पैसा खर्च होईल, असे निरीक्षण नाशिक सत्र न्यायालयाने नोंदवले होते.

## पोलिसांचा खडा पहारा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
नागपूरमध्ये सोमवारी रात्री औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मुद्यावरून मोठा हिंसाचार झाला. त्यात ३३ पोलिसांसह अनेकजण जखमी झाले. त्यानंतर रात्री उशिरा या दंगलीवर पोलिसांनी नियंत्रण मिळवले.

आज मंगळवारी येथील अनेक भागांत संचारबंदी लावण्यात आली आहे. यामुळे नेहमीच वर्दळ असणाऱ्या रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत आहे. पोलिसांकडून परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. दरम्यान, महाल भागात ज्या लोकांच्या गाड्या जाळण्यात आल्या, त्यांच्यात या घटनेवरून कमालीचा रोष पाहायला मिळाला. शहराच्या दक्षिण भागात मात्र जनजीवन सुरळीत असल्याचे दिसून आले. शहर वाहतूक तिकडे सुरू होती.



### मतदार कार्ड आधारशी लिंक करण्याची तयारी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :
केंद्र सरकार मतदार ओळखपत्र आणि आधार कार्ड लिंक करण्याची तयारी करत आहे. याबाबत मंगळवारी निवडणूक आयोग आणि भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. यासाठी लवकरच तज्ज्ञांचे मत घेतले जाईल.

आयोगाचे म्हणणे आहे की, मतदार कार्ड आधारशी जोडण्याचे काम सध्याच्या कायद्यानुसार आणि सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनांनुसार केले जाईल. यापूर्वी २०१५ मध्येही असाच प्रयत्न करण्यात आला होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ते बंद करण्यात आले.

निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, संविधानाच्या कलम ३२६ नुसार, मतदानाचा अधिकार फक्त भारताच्या नागरिकालाच दिला जाऊ शकतो, परंतु आधार ही केवळ व्यक्तीची ओळख आहे. त्यामुळे मतदार कार्ड आधारशी जोडण्यासाठी सर्व कायदे पाळले जातील, असा निर्णय घेण्यात आला असून, यावर लवकरच प्रक्रिया सुरू होईल.

## विधान परिषद पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची चिन्हे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :
विधान परिषदेसाठी रिक्त पाच जागांसाठी पोटनिवडणूक होत आहे. २७ मार्च रोजी मतदान प्रक्रिया होणार आहे. पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत सोमवारपर्यंत होती.

निवडणुकीसाठी ६ जणांचे अर्ज आले होते. मंगळवारी अर्जांची छाननी करण्यात आली. यामध्ये एका अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद ठरवण्यात आला आहे. त्यामुळे विधान परिषदेची पोटनिवडणूक बिनविरोध होणार असल्याची चिन्हे आहेत.

विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपकडून संदीप जोशी, संजय केनेकर आणि दादाराव केचे यांनी तर शिवसेनेकडून चंद्रकांत रघुवंशी आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजय खोडके यांनी अर्ज दाखल केला होता. यासोबतच एका अपक्ष उमेदवाराने अर्ज दाखल केला होता. मात्र, अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद ठरवण्यात आला आहे.

### ६ पैकी एक अर्ज बाद

अपक्ष उमेदवाराकडे आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र आणि नोटरी नसल्याने अर्ज बाद झाला. अर्ज मागे घेण्याची तारीख २० मार्च आहे. अशात निवडणूक अधिकारी २० तारखेनंतर बिनविरोध संदर्भात अधिकृत घोषणा करणार आहेत.

विधान परिषदेच्या ५ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असली तरी विरोधी पक्षांनी मात्र उमेदवार दिलेला नाही. कारण विधानसभेत महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या आमदारांची संख्या कमी आहे. त्यामुळे उमेदवार दिला तरी यश मिळणार नसल्याची खात्री असल्याने महाविकास आघाडीने या निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर केलेला नाही.

# नागपूर दंगलीवरून सर्वत्र संताप!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि. १८ :

सोमवारी नागपूर शहरात मोठा राडा झाला. दोन धार्मिक गटांत संघर्ष पेटल्यामुळे महालमधील झेंडा चौकात तणाव निर्माण झाला. दोन्ही बाजूने दगडफेक करण्यात आली. यात पोलिसांसह अनेकजण जखमी झाले. वाहनांची जाळपोळ आणि तोडफोडही करण्यात आली. जमावाला पांगवून परिस्थितीवर नियंत्रणासाठी पोलिसांनाही अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. रात्री उशिरापर्यंत परिसरात तणावाची स्थिती होती. राज्यभरात औरंगजेबाच्या कबरीवरून वाद सुरू

नागपुरात विहिंप आणि बजरंग दलाकडून महालच्या गांधी गेटवर शिवाजी पुतळ्यासमोर औरंगजेबाची कबर हटविण्यावरून आंदोलन करण्यात आले. बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी शिवाजी पुतळ्यासमोर औरंगजेबाचा पुतळा ठेवला. पोस्टरसोबतच पुतळ्यावर धार्मिक चादर ठेवली. त्यावर गुलाल टाकून पुतळा जाळण्यात आला. बजरंग दलाच्या या कृत्याचे व्हीडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आणि परिस्थिती चिघळली.

नंतरच्या काळात दगडफेक आणि जाळपोळ झाली . पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. दगडफेकीत पोलीस अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले. या प्रकरणात पोलिसांनी अनेकांना ताब्यात घेतले असून, विधीमंडळ अधिवेशनातही याचे पडसाद उमटले. विरोधक सत्ताधाऱ्यांवर तुटून पडत आहेत तर, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सफाई देत सुटले आहेत.

दरम्यान, मंगळवारी शहराच्या अनेक भागात संचारबंदी लागू करण्यात आली असून, राज्य राखीव दलाच्या तुकड्याही तैनात करण्यात आल्या आहेत. प्रकरणातील आरोपींना हुडकून काढले जात आहे. संपूर्ण परिस्थितीवर पोलीस अधिकारी लक्ष ठेवून आहेत. महालसह अनेक भागात मंगळवारी कडकडीत बंद पाळण्यात आल्याचे पाहायला मिळाले.









## त्यांना महाराष्ट्राचा मणिपूर करायचा..

### आदित्य ठाकरे यांचा आरोप



आमदार आदित्य ठाकरे यांनी नागपूर येथील हिंसाचाराच्या मुद्यावरून सत्ताधारी भाजपवर टीकेची झोड उठवली आहे. भाजपची महाराष्ट्राचा मणिपूर करण्याची इच्छा आहे. त्यांना ज्या ठिकाणी सत्ता राबवता येत नाही, त्या ठिकाणी ते दंगली घडवतात, असे ते म्हणालेत.

खुलताबाद स्थित औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मुद्यावरून सोमवारी रात्री नागपूर येथे हिंसाचार झाला. त्यात पोलिसांसह अनेकजण जखमी झाले. या प्रकरणाचे विधिमंडळातही तीव्र पडसाद उमटलेत. या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे यांनी भाजपवर टीका केली आहे.

ते विधिमंडळ परिसरात पत्रकारांशी बोलताना म्हणाले, नागपुरात हिंसाचाराची घटना घडली. पण मुख्यमंत्री कार्यालयाकडून कोणताही प्रतिसाद किंवा माहिती देण्यात आली नाही. जेव्हा अफवा पसरल्या तेव्हाही मुख्यमंत्री कार्यालयाने आपली प्रतिक्रिया दिली नाही. असे का झाले? असा प्रश्न मला पडला आहे.

**नागपूर दंगलीवर सीएमओचा प्रतिसाद नाही**

मुख्यमंत्री कार्यालयाचे काम मी अगदी जवळून पाहिले आहे. राज्यात एखाद्या ठिकाणी अशी घटना घडते, तेव्हा तत्काळ मुख्यमंत्री कार्यालयाला त्याची माहिती मिळते. गृह विभागालाही माहिती व रिपोर्ट मिळतो. त्यामुळे या विभागांना असे काही होणार आहे याची कल्पना आली नाही का? नागपूर हे तर स्वतः मुख्यमंत्री महोदयांचे शहर आहे. देवेंद्र फडणवीस स्वतः मुख्यमंत्री व गृहमंत्री आहेत.

आदित्य ठाकरे पुढे म्हणाले, भाजपला महाराष्ट्राचा मणिपूर करण्याची इच्छा आहे असा माझा आरोप आहे. मागील वर्षभरात मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या अनेक घटना घडल्या. तिथे कुणाला जाळले जात आहे, तर कुणाला मारून टाकले जात आहे. आता तिथे एखादी गुंतवणूक जाईल का? कुणाला तिथे पर्यटनाला जाता येईल का? याचे उत्तर नाही असेच आहे. हेच आता त्यांना महाराष्ट्रात करायचे आहे. त्यांना महाराष्ट्रातही अशीच परिस्थिती निर्माण करायची आहे. कारण, जिथे भाजपला सत्ता राबवता येत नाही, तिथे दंगली घडवण्याचे काम केले जाते.

**ज्वलंत प्रश्नांवरून लक्ष हटवण्याचा डाव**

भारत एक शक्तिशाली देश आहे. पण भाजपवाले आपल्या देशातील शक्ती तोडू पाहत आहेत. देशातील लोकांना धर्माच्या नावाखाली विभागले जात आहे. देशातील लोकांना जातीपातील विभागले जात आहे. असे केल्याने देशाची खरी ताकद जगाला दाखवता येणार नाही. भाजप सरकारचे हे अपयश आहे.

महाराष्ट्रात मागील काही महिन्यांपूर्वी भाजपचे सरकार स्थापन झाले. तेव्हापासून महिलांवरील अत्याचाराच्या घटनांत वाढ झाली आहे. शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत. शेअर बाजारातही मोठी पडझड सुरू आहे. या सर्व गोष्टी पुढे येऊ नयेत. या ज्वलंत प्रश्नांकडे जनतेचे दुर्लक्ष व्हावे, यासाठी औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा उखरून काढण्यात आला आहे, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

## द्वेषाचा सुनियोजित कट



नागपूर शहरात दोन गटांत झालेल्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सत्ताधाऱ्यांवर थेट आरोप करत राज्यातील वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा इशारा दिला आहे.

महाराष्ट्राचा एक विषारी मंत्री उघडपणे समाजात द्वेष पसरवत आहे आणि समाजात फूट पाडण्याचं काम करत आहे, असा गंभीर आरोप करत आंबेडकर म्हणाले, महाराष्ट्रात द्वेष पसरवण्यासाठी बाहेरून लोकांना आणले जात आहे. हे सर्व एका मोठ्या सुनियोजित कटाचा भाग आहे. आंबेडकर यांनी नागपूरसह राज्यातील नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन करत म्हटले, कोणत्याही अफवांकडे लक्ष देऊ नका. समाजात द्वेष निर्माण करणाऱ्या शक्तींना ओळखा आणि संयम ठेवा.

सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीत सामाजिक सलोखा कायम ठेवण्याचे महत्व अधोरेखित करत आंबेडकर म्हणाले, राज्यातील सत्ताधारी पक्ष आणि त्यांच्या पाठबळावर असलेल्या शक्ती समाजात फूट पाडण्याचा कट रचत आहेत. या हालचालींवर जनतेने बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे. समाजात शांतता आणि संयम राखण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे.

## समाजात फूट पाडण्याचा भाजपचा डाव

### अंबादास दानवे यांचा सरकारवर हल्लाबोल



नागपूरमध्ये घडलेल्या दंगलप्रकरणी विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सरकारवर तीव्र टीका केली आहे. मी विरोधक म्हणून नाही, तर राज्याचा नागरिक म्हणून बोलत आहे. नागपूरचे मुख्यमंत्री असूनही आणि गृहखातं स्वतःकडे असताना ही घटना घडते, यावरून गुप्तचर यंत्रणा झोपल्या होत्या का, असा प्रश्न निर्माण होतो, असे दानवे म्हणाले.

राज्यात प्रशासनावर आणि गृहखात्यावरचा वचक राहिलेला नाही. ज्या पद्धतीने वातावरण बिघडवले जात आहे, ते अतिशय गंभीर आहे. समाजात फूट पाडण्याचं काम सुरू आहे आणि सरकारच यामागे असल्याचा स्पष्ट संदेश यातून मिळतो, असा आरोप त्यांनी केला.

अबू आझमी यांनी केलेल्या वक्तव्यावर अद्याप कारवाई झालेली नाही. यावरून सरकारचा उद्देश स्पष्ट होतो. समाजात तणाव निर्माण करणे आणि त्यातून राजकीय पोळी भाजणे हे भाजपचं काम सुरू आहे, असे दानवे म्हणाले.

भाजपच्या बगल बच्च्यांनी वातावरण चिघळवण्याचं काम केलं आहे. भाजप, बजरंग दल, विहिंप, संघटनेतील लोकांच्या वक्तव्यावरूनही हेच दिसून येत आहे की, समाजात फूट पाडण्याचा डाव रचला जात आहे.

नितेश राणे एकटेच नाहीत, हे सगळेच यात सामील आहेत, अशी टीकाही अंबादास दानवे यांनी केली. हे थांबवायचं असेल तर सरकारने तातडीने कठोर भूमिका घ्यावी, उचित अशी कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.



■ नागपूर : शहरातील दगडफेकीनंतर मनपा आणि यंत्रणेने या भागातून जवळपास एक ट्रॉलीभर दगड ताब्यात घेतले.

## दगडफेकीची घटना चिंताजनक

### बसपाचे डॉ. चलवादी यांनी व्यक्त केली चिंता

पुरोगामी महाराष्ट्राच्या उपराजधानीत घडलेली हिंसाचाराची घटना चिंताजनक आहे.दोन गट समोरोसमोर आल्याने घडलेली ही घटना महाराष्ट्रातील शांततेचे वातावरण बिघडवणारी आहे.अशात धार्मिक तेढ आणि चिथावरणीखोर वक्तव्य करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव आणि पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी यांनी आज, मंगळवारी केली आहे.

नागपूर येथील भालदारपुरा येथे निर्माण झालेली परिस्थिती ही राज्याच्या गृहखात्याचे मोठे अपयश आहे.अशाप्रकारच्या घटना नागपूर सारख्या शांतताप्रिय शहरासाठी धक्कादायक आहे. हिंसाचार घडवून आणण्याचा पूर्वनियोजित कट होता का? याचा शोध पोलिसांनी घेण्याची गरज आहे.

उपराजधानीच्या मध्यवर्ती भागात अशाप्रकारच्या दगडफेकीच्या घटना घडत असतील तर सत्ताधाऱ्यांनी राज्यातील असंतोषाला वेळीच ओळखण्याची आवश्यकता आहे,असे मत डॉ. चलवादी यांनी व्यक्त केले. अशाप्रकारच्या घटना राज्यातील इतर भागांमध्ये घडू नये याची काळजी सरकारने घ्यावी, असे आवाहन डॉ. चलवादी यांनी केले आहे.

राज्यात गेल्या काळी काळात ठरवून तणाव निर्माण होईल, असे वक्तव्य केले जात आहे. अशा वक्तव्यावर सरकारने वेळीच आळा घालून संबंधितांवर कारवाई करण्याची गरज निर्माण झाली असल्याचे डॉ. चलवादी म्हणाले. पोलिसांवर दगडफेक करणे समर्थनिय नाही. दगडफेकीत अनेक पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. तणाव सदृश्य वातावरण निर्मिती करणाऱ्यांवर कारवाईची आवश्यकता असल्याचे मत डॉ. चलवादी यांनी व्यक्त केले.

छत्रपती-फुले-शाहू-आंबेडकर आणि संतांनी घडवलेल्या पुरोगामी महाराष्ट्रात अशाप्रकारच्या घटनांना स्थान नाही. महाराष्ट्रात विविध जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. अशात या घटनेला जबाबदार असणाऱ्या मुख्य 'मास्टर माईंड'ला अटक करण्याची मागणी डॉ.चलवादी यांनी यानिमित्ताने केली आहे.

## गृहमंत्र्यांच्या भागातच गोंधळ, ही दुटप्पी भूमिका..

### सचिन अहिरांची सरकारवर टीका



नागपूरमध्ये काल झालेल्या दंगलप्रकरणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे आमदार सचिन अहिर यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. या प्रकरणी विधानसभेत स्थगन प्रस्ताव मांडणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

सगळ्यात दुर्दैवी बाब म्हणजे याची सुरुवात गृहमंत्र्यांच्या भागातच झाली. जर गृहमंत्र्यांच्या भागातच अशी घटना घडत असेल तर राज्यातील कायदा-सुव्यवस्थेची स्थिती स्पष्ट होते,₹ असा टोला अहिर यांनी लगावला. ₹मुख्यमंत्री स्वतः म्हणाले की, ही घटना पूर्वनियोजित होती. मग त्यांचं इंटेलिजन्स विभाग झोपला होता का? आठवडाभरापासून वाद सुरू असताना सरकार काय करत होतं? असा थेट सवाल त्यांनी केला.

गेल्या काही दिवसांपासून हा वाद सुरु आहे. इतका काळ असताना सुद्धा अशा प्रकाराला सरकारने थांबवलं नाही, यामुळेच हा गोंधळ झाला, असेही अहिर म्हणाले.

मंत्री नितेश राणे यांच्यावर टीका करताना ते म्हणाले, एक मंत्री म्हणतो कबर तोडली पाहिजे, तर दुसरा मंत्री म्हणतो त्याचं संरक्षण केलं पाहिजे. ही दुटप्पी भूमिका दुर्दैवाने जनतेला पाहायला मिळते आहे. तत्काळ दोषींवर कारवाई झाली पाहिजे, अन्यथा हा प्रकार पुन्हा घडण्याची शक्यता आहे, अशी मागणीही सचिन अहिर यांनी केली.

## मुख्य मुद्यांवरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न

### अमोल मिटकरी यांचा आरोप



नागपूरमधील घटनेवरून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला आहे. औरंगजेबाची कबर संभाजीनगरमध्ये, पण दंगल होते नागपूरमध्ये. रमजानच्या काळात गरीब लोक तिथे होते, मग हे जाणीवपूर्वक घडवले गेले का? असा सवाल मिटकरींनी केला.

आंदोलन शेतकऱ्यांच्या प्रश्नावर व्हायला हवं होतं, पण दुर्लक्षित मुद्दे टाळून औरंगजेबाच्या नावावर राजकारण केलं जातंय. कोरटकरच्या वक्तव्यानंतर किंवा संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर आंदोलन का झालं नाही? नागरगोजे या शिक्षकाने आत्महत्या केल्यानंतर कोणालाही वाईट का वाटलं नाही? असे सवालही मिटकरींनी उपस्थित केले.

सभागृह आज औरंगजेबाच्या मुद्यावर बंद पाडलं जातंय, पण हे मुद्दे का उचलले जात नाहीत? दंगेखोर फरार आहेत, मात्र कोरटकर पोलिसांच्या संपर्कात आहे, असे म्हणत त्यांनी सरकारची भूमिका संशयास्पद असल्याचे स्पष्ट केले.

राजमाता जिजाऊ आणि सईबाई यांच्या समाधीचे सुशोभीकरण का केले जात नाही? एका गटाकडून प्रतिक्रिया आली की दुसरीकडून उत्तर येणारच. या दंगली का भडकतात? मोदींची तुलना शिवरायांशी होऊ शकत नाही. तो टी राजा कबर खोदण्याची भाषा करतो, आमच्या मुलांना नादाला लावत आहे. जर हिंमत असेल तर सरळ या, महाराष्ट्राचं वातावरण का बिघडवताय? अशी टीका मिटकरींनी केली.

नितेश राणे यांची वक्तव्य वैयक्तिक आहेत, त्यांचा खुलासा ते करतील. काल इतिहासावर ते बोलले, त्यांना पुस्तक देणार आहे, महाभारतातला संजय हुशार होता, पण इथले संजय काय बोलतात माहीत नाही, असा टोला त्यांनी संजय राऊतांना लगावला.

## दंगल करणाऱ्यांना सोडणार नाही!

### प्रविण दरेकरांचा स्पष्ट इशारा



नागपूरमध्ये घडलेल्या घटनेवर विधान परिषदेतील भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे. ही घटना पूर्वनियोजित कट वाटतोय, समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. अशा प्रवृत्ती दंगल घडवत असतील आणि कायदा-सुव्यवस्था बिघडवत असतील, तर त्यांना अजिबात सोडणार नाही, कठोर कारवाई होईल, असा इशारा दरेकरांनी दिला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही शांतता आणि संयम राखण्याचे आवाहन केल्याचे दरेकर यांनी सांगितले. मुख्यमंत्री आणि गडकरी साहेबांनी संयम ठेवण्याचे सांगितले आहे. कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका, असे त्यांनी स्पष्ट केले.

या मुद्दयावर विधान परिषदेच्या सभागृहातही आपले मत मांडणार असल्याचे दरेकरांनी सांगितले. नितेश राणे केवळ बोलले, त्यावरून वाद निर्माण करणे योग्य नाही. वड्याचं तेल वांग्यावर काढू नका,₹ अशा शब्दात त्यांनी टीकाकारांना सुनावले. कोणत्याही प्रकारे कबरीचं उदात्तीकरण होऊ नये. अत्याचार करणाऱ्या इतिहासातील व्यक्तींची भलावण होणे योग्य नाही, असे मतही दरेकरांनी व्यक्त केले.

## प्लॅनिंग करून हिंसा घडवली..



औरंगजेबाची कबर हटवण्यात यावी, या मागणीसाठी १७ मार्च रोजी राज्यभरात प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्याचे बजरंग दलाने ठरवले होते. संपूर्ण महाराष्ट्रात हा कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. मात्र, नागपूरमध्ये औरंजेबाला मानणाऱ्या काही लोकांनी अफवा पसरवली. त्यांचा उद्देश केवळ हिंसा करण्याचा होता. अशा जिहादी लोकांवर कठोर कारवाई व्हावी, अशी विश्व हिंदू परिषद करत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितली. नागपूरमध्ये सोमवारी घडलेल्या घटनेचाही विश्व हिंदू परिषदेच्या वतीने निषेध करण्यात आला.

आमचे राज्य हे छत्रपती शिवाजी महाराजांचे आहे. छत्रपती संभाजी महाराजांसोबत कशाप्रकारचा व्यवहार करण्यात आला, तो कुणी केला, अशा औरंगजेबाचा नामोनिशाण महाराष्ट्राच्या जमिनीवर असू नये, यासाठी संघटनेने त्याची कबर हटवण्याचा निश्चय केलेला आहे. मात्र, औरंगजेबाला मानणारे लोक आजही आहेत, असे चित्र काल नागपूरमध्ये दिसले. आम्ही आज कालच्या घटनेसंदर्भात पालकमंत्री बावनकुळे आणि स्थानिक आमदारांची भेट घेतली, असेही विश्व हिंदू परिषदेच्या वतीने सांगण्यात आले.

औरंगजेबाला आपला आदर्श मानणारे आणि जिहादींना काल जी तोडफोड आणि जाळपोळ केली, ती सर्व एका प्लॅनिंग करून केले, काल दुपारी आमचे आंदोलन झाल्यानंतर आमचा विषय संपला होता. परंतु, रात्रीच्या वेळी त्यांनी पूर्ण नियोजन करून ती घटना घडवली. जो उपद्रवी तोडफोड करेल, त्याची संपत्ती नष्ट करून त्याच्याकडून भरपाई घ्यावी, अशी आमची मागणी असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

या घटनेत सहभागी सर्व आरोपींची घरे नष्ट करावीत, ते विकून नुकसानग्रस्त हिंदू कुटुंबांना त्यांची भरपाई द्यावी. कालच्या घटनेत 50-60 च्यावर वाहने जाळण्यात आली. रस्त्याने जाणाऱ्या महिलांचीही छेड काढली. हिंदू समाजाचे जेवढेही नुकसान झाले, त्याची भरपाई करावी. आरोपींना पकडून भरपाई न केल्यास विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल येणाऱ्या काळात आंदोलन करू, असा इशारा यावेळी विश्व हिंदू परिषदेच्या वतीने देण्यात आला.

## अनुसूचित जातीतील उमेदवारांसाठी १८ दिवसीय निवासी प्रशिक्षण

**अकोला :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे महाराष्ट्र उद्योजक, व्यापार व गुंतवणूक सुलभता कक्ष यांच्या सहकार्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेत अनुसूचित जातीतील उमेदवारांसाठी १८ दिवसीय निवासी उद्योजकता विकारा प्रशिक्षण आयोजिण्यात येत आहे.वय १८ ते ४८ दरम्यान, तसेच किमान ८ वी उत्तीर्ण उमेदवारांना सहभागी होता येईल. शाळा सोडण्याचा दाखला. जातीचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, तसेच अमरावती येथे निवासी राहण्याची तयारी असल्याचे पत्र आदी कागदपत्रांसह इच्छूकांनी अर्ज करावा.

या प्रशिक्षण कार्यक्रमात उद्योजकीय व्याक्तीगत्व विकास, उद्योजकीय गुणसंपदा. शासकीय योजनेची माहिती, बँकेची कार्यप्रणाली, प्रकल्प अहवाल, मार्केटिंग व व्यवसायाला लागणारी माहिती याविषयी प्रशिक्षण तज्ज्ञ व्यक्तीकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

प्रवेशासाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जिल्हा उद्योग केंद्र, चांडक बिछायत केंद्राच्या बाजूला दुर्गा चौक, अकोला यांच्याकडे दि. १९ मार्च रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी कु. कल्याणी तिजारे यांच्याशी मो.नं. ९८२२३९१३३७ वर संपर्क साधावा.

---

### जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला कायदा व सुव्यवस्थेचा आढावा

## जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखा आवश्यक तिथे प्रतिबंधात्मक कार्यवाही करा : जिल्हाधिकारी

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी):** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्व यंत्रणांनी सजग राहून कार्यवाही करावी. आवश्यक तिथे प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी. कुठेही अनुचित प्रकार घडत असल्याचे आढळताच वस्तुस्थिती तपासून निष्पक्षपणे कारवाई करावी. नागरिकांमध्ये यंत्रणेबाबत विश्वासार्हता वृद्धिंगत करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.नागपूर येथील सामाजिक तणावाच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित सर्व यंत्रणांची ऑनलाईन बैठक जिल्हाधिका-यांनी घेतली.



त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा पोलीस अधिक्षक बच्चन सिंह, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, महापालिका आयुक्त सुनील लहाने, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, ठाणेदार, नगरपालिका मुख्याधिकारी आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कुंभार म्हणाले की, नागपूर येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर अकोल्यात कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सर्व यंत्रणांनी खबरदारी घ्यावी. विविध मागण्यांची निवेदने देण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिक जमा होतात. अशा ठिकाणी खबरदारी घ्यावी. स्थानिक स्तरावर मोर्चे, आंदोलनांना परवानगी देताना मुंबई पोलीस अधिनियमाद्वारे लागू आदेशांचे पालन होईल याची खातरजमा करावी. आवश्यक तिथे कठोर उपाययोजना राबवाव्यात. कोणत्याही धार्मिक स्थळांलगतच्या रस्त्यांवरून आंदोलन, मोर्चे काढू नये. पुढील काळात सण-उत्सव शांततेत पार पडतील याची दक्षता घ्यावी.

ते पुढे म्हणाले की, स्थानिक स्तरावर कुठेही अनुचित प्रकार घडत असेल किंवा तसे घडण्याची शक्यता आढळल्यास त्याचवेळी जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्यावे. सायबर पोलीस सेलकडून समाजमाध्यमांचे संनियंत्रण केले जाते. त्यासोबत उपविभागीय अधिकारी व तहसीलदार स्तरावरही संनियंत्रण व्हावे. माध्यमांना आवश्यक वस्तुनिष्ठ माहिती मिळेल याची दक्षता घ्यावी व संपर्कात राहून माहितीचे आदानप्रदान करावे. गावपातळीवरही चुकीचे संदेश प्रसारित होणार नाहीत याची काळजी घ्यावी. अधिका-यांनी या कालावधीत मुख्यालय सोडू नये. विनापरवानगी रजा कुणीही घेऊ नये, असे निर्देश त्यांनी दिले.

जिल्ह्यात रात्रीचा वीजपुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता 'महावितरण'ने घ्यावी, तसेच सण-उत्सवानिमित्त सार्वजनिक ठिकाणी लावलेले झेंडे आदी बाबी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सणाचे औचित्य संपल्यानंतर तत्काळ हटवाव्यात. आवश्यक तिथे प्रतिबंधात्मक कार्यवाही करा, असे निर्देश त्यांनी दिले.

पोलीस अधिक्षक श्री. सिंह म्हणाले की, सोशल मीडिया सेलद्वारे प्रसारित मजकुराचे संनियंत्रण होते. तथापि, सर्व यंत्रणांनीही आपल्या निदर्शनास आलेल्या बाबी तत्काळ कळवाव्यात. सर्व यंत्रणांमध्ये सतत संपर्क व समन्वय ठेवावा. गावपातळीवरील यंत्रणेपर्यंतही याबाबतच्या सूचना तत्काळ प्रसारित केल्या जातील, असे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वैष्णवी यांनी सांगितले.

---

## मंगळसूत्र वाचले पण,सौभाग्य गेले!

### मंगळसूत्र चोर, मारेकरी रवि अटकेत

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी):** पत्नी हर्षा गावंडे हिचे मंगळसूत्र चोरणारा चोरटा रेल्वे स्थानकावरुन पळत असताना त्याचा पाठलाग करत करत त्या चोरट्यांशी झटापटीत हेमंत गावंडे यांच्या चेहऱ्याावर चोरट्याने पेव्हर फेकून मारले आणि तो पळला. पण, या झटापटीत हेमंत च्या चेहऱ्यावर डोक्यावर गंभीर दुखापत झाली. त्याला लगेच सवीपचार मधुन खाजगी रुग्णालयात दाखल केले. पण, आज उपचार सुरु असताना हेमंत गावंडे यांचा मृत्यू झाला. पत्नी हर्षा यांचे सौभाग्य अंलकार असलेले मंगळसुत्र वाचविण्याचा पुर्ण प्रयत्न पती हेमंत गावंडे यांनी केला. पण, या प्रयत्नात त्यांचा जीव गेला. पण, तीन वर्षीय योगीराज च्या डोक्यावरील वडीलांचे छत्र कायम चे हरपले. या प्रकरणात आरोपी रवि नाथुलाल परमार रा.कुदाना जि.इंदौर याला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे.



हा सर्व प्रकार होत असताना रेल्वे स्थानकावर तैनात पोलिस काय करत होते. याची चौकशी होण्याची गरज आहे. अकोला रेल्वे स्थानक (मध्य रेल्वे व दक्षिण मध्य रेल्वे ) कोट्यावधी रुपये प्रवासी तिकिटाच्या स्वरुपात रेल्वेला देत असताना रेल्वे प्रवाशांची सुरक्षा करण्याची जबाबदारी रेल्वे पोलिसांवर असताना त्यांनी या सर्व प्रकरणाँत काय केले असा प्रश्न उपस्थित होत आहे. या सर्व प्रकरणात रेल्वेने गावंडे परिवाराला आर्थिक मदत करण्याची गरज आहे. अकोट येथून रेल्वेने अकोल्याला आले असताना गावंडे परिवारासोबत हा प्रकार झाला. या संपुर्ण घटनेचे सीसीटीव्ही फुटेज रेल्वेकडे उपलब्ध आहे.

रेल्वे स्थानकातून चोरटा मंगळसुत्र घेऊन पसार होताना व त्या पाठोपाठ हेमंत गावंडे चोरट्याचा पाठलाग करत आहे. हा सर्व प्रकार रेल्वे स्थानकावर झाला असून त्यामुळे रेल्वे हेमंत गावंडे यांच्या हत्या प्रकरणात परिवाराला मदत करण्याची मागणी हेमंत गावंडे यांचे बंधु विकास यांनी केली आहे. दक्षिण मध्य रेल्वे असो की, मध्य रेल्वे पण, झालेला सर्व प्रकार हा प्रवासी हर्षा गावंडे व पती हेमंत गावंडे यांच्यासोबत झाला. त्यामुळे रेल्वेच्या सुरक्षा यंत्रणेतील त्रुटी आणि प्रवाशाचा झालेला मृत्यू पाहता रेल्वेने या प्रकरणात गावंडे परिवाराला आर्थिक मदतीची मागणी विकास गावंडे यांनी केली आहे.दक्षिण मध्य रेल्वेच्या जनसंपर्क कार्यालयात गावंडे परिवाराच्या मदतीचा प्रश्न इमेल ने विचारला होता. पण, वृत्तलिहेस्तोवर यावर जनसंपर्क विभागाने कुठलाही माहिती दिली नाही.

---

## शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्जांबाबत तत्काळ पूर्तता करा : समाजकल्याण सहायक आयुक्तांचे आवाहन

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी):** सामाजिक न्याय विभागाकडून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना राबवल्या जातात. या योजनांचे बरेच अर्ज अद्यापही विद्यार्थी व महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असून, त्याची तत्काळ पूर्तता करण्याचे आवाहन सहायक समाजकल्याण आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी,परीक्षा फी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन, व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना राबविण्यात येत आहेत.

चालू आर्थिक वर्ष संपण्यासाठी अत्यंत कमी कालावधी राहिला असून, महाडीबीटीच्या डॅशबोर्डवर २०२४-२५ या वर्षात महाविद्यालय स्तरावर १ हजार ८९७, तसेच विद्यार्थी स्तरावर ८३७ अर्ज प्रलंबित आहेत. सन २०२३-२४ या वर्षातील महाविद्यालय स्तरावर २९६ व विद्यार्थी स्तरावर ७९३, सन २०२२-२३ या वर्षात महाविद्यालय स्तरावर १३९ व विद्यार्थ्यांकडे ७३७ अर्ज प्रलंबित आहेत. त्याच प्रमाणे, सन २०२१-२२ या वर्षात महाविद्यालय स्तरावर १३६ व विद्यार्थीस्तरावर ३७२ अर्ज प्रलंबित आहेत. यापूर्वी कार्यालयाकडून महाविद्यालयांना कळवूनही अर्ज प्रलंबित असणे ही बाब गंभीर आहे. महाविद्यालयांनी प्रलंबित अर्जांची तपासणी व पडताळणी करून तसेच अर्जाची त्रुटींची पूर्तता करावी. नोंदणीकृत सर्व प्रलंबित अर्जांची पडताळणी करून अंतिम मंजुरीसाठी कार्यालयाच्या लॉगइनवर पाठवावे जेणेकरून पुढील कार्यवाही होऊ शकेल, असे आवाहन श्रीमती राठोड यांनी केले आहे.

---

## महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण कराल तर तुरुंगात जाल!

**दोषींना २ ते १० वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद**

**परिमंडळात वीज बिलासाठी वसुली मोहिम तीव्र**

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी):** परिमंडळात वीजबिल वसुली मोहिम तीव्र करण्यात आली आहे.दरम्यान महावितरणच्या कर्मचाऱ्यांना होणारी धक्काबुक्की,शिवीगाळ अश्या निंदणीय घटना परिमंडळात घडल्या आहेत. महावितरणच्या परिमंडळ प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली असून संबंधित व्यक्तींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करून तात्काळ कारवाईसाठी प्रशासनाकडून पाठपुरावा करण्यात येणार आहे. विजेचे बिल वेळेत भरणे हे ग्राहकाचे कर्तव्य आहे.जर ग्राहक वीजबिल भरण्याला प्रतिसाद देत नसेल तर त्या ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित करण्यात येतो.त्यामुळे ग्राहकांनी वीजबिल भरून सहकार्य करावे असे आवाहन मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले आहे.



चालू आर्थीक वर्षाचे केवळ १३ दिवस बाकी आहे, अद्याप परिमंडळातील घरगुती,वाणिज्यिक,औद्योगिक आणि इतर वर्गवारीतील ग्राहकांकडून २४२ कोटी वसूल होणे बाकी आहे. ग्राहक वीजबिल भरत नसल्याने महावितरणचे अभियंते, अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून राबविण्यात येत असलेल्या मोहिमेत कर्मचारी थकबाकीदारांच्या दारात पोहचत आहे.बिल भरले नाही तर वीज नाही असा नाईलाजास्तव पवित्रा घेत महावितरणकडून थकबाकीदाराचा वीज पुरवठा खंडित करण्यात येत आहे,

तथापि वीजबिल थकविणाऱ्या ग्राहकांकडून महावितरणच्या कर्मर्चायांना शिवीगाळ, मारहाणीच्या काही अनुचित घटना परिमंडळात घडल्या आहेत. शासकीय कामात अडथळा आणणे, सरकारी कर्मचाऱ्यांना मारहाण करणे किंवा कार्यालयांची तोडफोड करणे आदी प्रकरणांमध्ये दोषी व्यक्तीकरीता भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये २ ते १० वर्षापर्यंत शिक्षेची तरतूद आहे. अशा प्रकरणांमध्ये व्यवस्थापन संबंधित अभियंते व कर्मचाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून संबंधितावर नक्की कायदेशीर कारवाई होणार याची जाणीव ठेवत वीज ग्राहकांनी नियमानुसार आणि वेळेत थकबाकीचा भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

---

## थोडक्यात

### मारहाण व शिवीगाळ प्रकरणी गुन्हा दाखल

**तेल्हारा :** तेल्हारा तालुक्यातील ग्राम भांबेरी येथे फिर्यादी गौरव श्रीधर भारसाकडे वय ३५ वर्षे राहणार भांबेरी यास दिनांक १४ मार्च रोजी दुपारी १.१५ वाजेदरम्यान क्षुल्लक कारणावरून लोखंडी शिक मारून जखमी केल्याप्रकरणी व शिवीगाळ केल्याप्रकरणी चुलत काका व काकू विरुद्ध तेल्हारा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. खड्डे खोदणे सुरू असताना फिर्यादी गौरव श्रीधर भारसाकळे यांचे चुलत काका नामे नागोराव रामदास भारसाकळे वय ४८ वर्षे व काकू नामे संगीता नागोराव भारसाकळे वय ३५ वर्षे दोन्ही राहणार भांबेरी तालुका तेल्हारा हे आले व नागोराव भारसाकळे यांनी खड्डे खोदु नका, माझा येण्या जाण्याचा रस्ता आहे ङ्गअसे म्हणून हातात शीक घेऊन फिर्यादीच्या पायावर मारून जखमी केले. तर संगीता नागोराव भारसाकडे यांनी फिर्यादीला शिवीगाळ केली.

---

## मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेच्या कालावधीत वाढ

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी):** कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नाविन्यता विभागातर्फे मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेत युवकांना प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम केले जाते. या योजनेचा कालावधी आता ६ महिन्यांहून ११ महिन्यांपर्यंत वाढविण्यात आला आहे, असे सहायक रोजगार आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी सांगितले. ज्या उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी १० मार्चपूर्वी पूर्ण झाला अशा उमेदवारांना पुढील ५ महिन्याच्या प्रशिक्षणासाठी संबंधित आस्थापनेत रूजू होता येईल. अशा प्रशिक्षणार्थींनी आस्थापनेशी संपर्क साधून दि. ३० एप्रिलपूर्वी रूजू व्हावे. संबंधित कार्यालये व आस्थापनांनी याबाबत ऑनलाईन पोर्टलवरील कार्यवाहीची पूर्तता करावी. प्रशिक्षणार्थ्यांनी पुन्हा रूजू होण्याची शेवटची तारीख ३० एप्रिल आहे.

काही अडचण आल्यास जिल्हा कौशल्य विकास व रोजगार मार्गदर्शन केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन श्री. शेळके यांनी केले.

---

## फॅम च्या प्रदेश उपाध्यक्ष पदी रमाकांत खेतान

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी):** राज्यातील ७५० लघु उद्योग, व्यापार व सेवा वर्गीय संस्था,संघ,असो.ची मातृसंस्था असणाऱ्या मुंबई येथील फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र अर्थात 'फॅम'च्या प्रदेश उपाध्यक्ष पदी जेष्ठ उद्योजक रमाकांत खेतान यांची निवड करण्यात आली. खेतान यांचा कार्यकाळ दोन वर्षांचा राहणार आहे.मुंबई येथे नुकत्याच संपन्न झालेल्या फॅमच्या प्रदेश निवडणुकीत खेतान यांची प्रदेश उपाध्यक्ष पदावर वर्णी लागली.फॅमचे नूतन प्रदेश अध्यक्ष जितेंद्र शाह व चेअरमन विनेश मेहता यांच्या कार्यकरणीत खेतान समवेत ४१ कार्यकारी मंडळ कामकाज बघणार आहे. फॅमच्या मुंबई येथील कार्यालयात संपन्न झालेल्या प्रदेश कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नगीनदास शाह,चंपालाल शाह यांनी कामकाज बघितले.बहुआयामी व दी अकोला जनता बँक समवेत अनेक सामाजिक, आर्थिक व व्यापारीक संस्थांवर सेवारत असणारे रमाकांत खेतान यांच्या या निवडीमुळे पश्चिम विदर्भातील लघु उद्योग, व्यापार व सेवा संस्थांच्या अडीअडचणीचे निरसन होऊन अश्या संस्था असोसिएशनला नवी चालना मिळून महानगर हे राष्ट्रीय स्तरावर नव्याने ओळखल्या जाणार आहे.रमाकांत खेतान यांच्या या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.



---

## विद्यार्थ्यांना खेळातील वाढीव गुणांसाठी ऑनलाईन अर्ज आवश्यक

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी):** खेळांमध्ये चमकदार कामगिरी करणा-या विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण दिले जातात. त्याची प्रक्रिया आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली असून, १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांनी ग्रेस गुणांसाठी अर्ज शिक्षण मंडळाकडे केवळ ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने केले आहेत.

कोणीही जिल्हा क्रीडा अधिकारीकार्यालय,शिक्षण मंडळास ऑफलाईन अर्ज करू नये. ते स्वीकृत केले जाणार नाहीत. वाढीव गुणांसाठी अर्ज सादर करताना मंडळाच्या नियमानुसार २५ रू चलन भरावे लागेल. त्याची प्रत प्रस्तावासोबत जोडावी. सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपले सरकार ॲपचा वापर विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरून घ्यावे.

---

## योगीराज भजनी मंडळाने केला सैनिक मातांच्या सत्कार

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी):** स्थानीय दाबकी रोड परिसरातील योगीराज महिला भजनी मंडळाच्या वतीने देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या मातांचा सत्कार करण्यात आला.



दाबकी रोड परिसरातील अंगत पंगत येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमाची अध्यक्षता अर्चना शर्मा यांनी केली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेविका मंगला म्हैसने, माधुरी क्षीरसागर, रंजना विचंनकर, माजी उपमहापौर वैशाली शेळके, पुष्पा वानखडे आदी उपस्थित होत्या. या कार्यक्रमात सविता बोंडे यांचा सुनंदा गावंडे यांनी सत्कार केला. तर शकुंतला प्रधान यांचा रुक्मिणी पुरी यांनी, कविता बाहेकर यांचा सत्कार लता खांडेकर यांनी,वर्षा ताले यांचा सत्कार सुनीता गावंडे यांनी व माया गवई यांचा सत्कार रंजना विंचनकर यांनी केला .यावेळी शिक्षक दीपक जागृत यांनी महिलांना मानसिक व शारीरिक सुदृढतेसाठी मार्गदर्शन केले. अर्चना शर्मा यांनी यावेळी आपल्या मनोगतात देशासाठी लढणाऱ्या सैनिकांच्या मातांचा ऊहापोह करीत महिला दिनाच्या त्यांना शुभेच्छा दिल्यात.

त्यावेळी सुनंदा गावंडे यांनी या कार्यक्रमाची माहिती दिली. संचालन मनीषा गावंडे यांनी तर आभार रुक्मिणी पुरी यांनी मानलेत. यावेळी भजनी मंडळ अध्यक्ष रुक्मिणी पुरी,सुनंदा गावंडे, लता खांडेकर, रंजना पढाले,सांगळे ताई,संजीवनी पुरी,भाकरे ताई,आशा खरपकर,प्रतिभा मेटांगे,सुनीता शर्मा, ठाकरे ताई,पाटखेडे ताई समवेत बहुसंख्य महिला पदाधिकारी व सदस्या उपस्थित होत्या.

---

## सेठ बन्सीधर विद्यालय स्नेहमीलन सोहळा आयोजित

**तेल्हारा :** तेल्हारा येथील सेठ बन्सीधर विद्यालयाच्या २०२५ शताब्दी महोत्सवी वर्षात आगामी शनिवार दि. २२ मार्च व रविवार दि. २३ मार्च असे द्विदिवसीय माजी विद्यार्थी - गुरुजन स्नेह मिलन समरंभाचे आयोजन करण्यात आलेआहे. सेठ बन्सीधर दहिगावकर हायस्कूल एज्युकेशन सोसायटी तेल्हारा, सन २०२५ मध्ये शताब्दी महोत्सवी वर्ष साजरे करीत असून त्या अनुषंगाने संस्थेतील माजी विद्यार्थी - गुरु भेटीच्या अभिलाषेने सेठ बन्सीधर विद्यालयात स्नेह मिलन सोहळ्याचे आयोजन दि. २२ मार्च २०२५ आणि २३ मार्च २०२५ असे दोन दिवस करण्यात आले आहे. असे शताब्दी महोत्सव समिती, सेठ बन्सीधर विद्यालय. तेल्हारा चे अध्यक्ष गोपालदास मल्ल यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

---

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name From-
RUSHIKESH ANIL PIMPALGAVKAR
- TO -
RUSHIKESH ANIL PIPLGAOKAR
My Residential Address is - Dabaki Road Laxmi Nagar Dapaki Akola 444002 MH.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name From-
GAYATRI WASUDEO ROHANKAR
- TO -
GAYATRI VASUDEORAO ROHANKAR
My Residential Address is - Behind of Hotel Walmiki Jijamata Nagar Shegaon Buldhana MH 444203

---

## ईपीएफ-९५ पेन्शनरांनी केंद्र सरकारच्या निषेधार्थ घंटानाद आंदोलन करुन नोंदविला निषेध



**अकोला,दि १८ (प्रतिनिधी):** १८ मार्च रोजी ई. पी. एस ९५ पेन्शनरांनी केंद्र सरकारच्या निषेधार्थ लोकशाही मार्गाने घंटानाद आंदोलन करुनआपल्या मागण्यांचे निवेदन आयुक्त भविष्य निर्वाह निधी कार्यालय अकोला यांना सादर केले. आंदोलनात यवतमाळ, पुसद, उमरखेड, वाशीम, बुलढाणा व अकोला येथील पेन्शनरांनी भाग घेवून आंदोलन यशस्वी केले. आंदोलनाला मार्गदर्शन करतांना यवतमाळ येथील परिवहन संघटनेचे सचिव श्री. डि के. भगत, यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून वस्तुस्थितीला धरुन योग्य मार्गदर्शन केले. पुसद येथील ओमप्रकाश चौधरी, उमरखेड येथील के. पी. मुळे यांनी सरकारवर आसूड ओढत यथोचीत मागदर्शन केले. अध्यक्ष देवराव पाटील यांनी सांगितले की, गेली पंधरा वर्षे संघटनेतर्फे आपल्या मागणी करीता रेल रोको, जेल भरो धरणे आंदोलन तसेच रस्ता रोको असे विविध प्रकारचे आंदोनले करुन आपल्या पेन्शन वाढीकरीता प्रयत्न केले. परंतु केंद्र सरकारने नकारात्मक भुमिका घेवुन वेळ काढु धोरण स्विकारले. वास्तविक पाहता आमचे व्याज जरी पेन्शनरांना वितरीत केले तर अवसतन १५९२.४५ येते सन २०२२-२३ मध्ये पेन्शन निधीवर केवळ व्याज ५१९८५.८२ करोड रुपये जमा झाले.

परंतु पेन्शनरांना केवळ १४४४४.६० करोड वाटल्या गेली. ही रक्कम जमा झालेल्या व्याजाच्या केवळ २८% आहे. त्यावर्षी पेन्शन घेणाराची संख्या ७५,५८,९१३ होती. जर पुर्ण व्याज पेन्शनरांना पेन्शन म्हणुन दिली असती तर अवसतन ५७३१.४५ मिळाली असती. यामुळे येणारे व्याज व वाटण्यात येणारी रक्कम यात खुप मोठी तफावत आहे. अशी परीस्थिती असतांना ईपीएफओ ऑफीस पेन्शन फंड घाटयात आहे. हे नेहमीच रडगाणं गात असते. आणि केंद्र सरकार त्याला सहकार्य करते. त्यामुळे पेन्शनरांना पेन्शन न वाढण्यात ईपीएफओ ऑफीस जबाबदार आहे.

**अकोला,दि १८ (प्रतिनिधी):**

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम कोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# औरंगजेब जिवंत होतो तेंव्हा...

सुमारे ४०० वर्षापूर्वी मरण पावलेल्या आणि खुलताबादेच्या मातीत गाडल्या गेलेल्या औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यात वाद उफाळला आहे. औरंगजेबाची कबर नष्ट करण्याची मागणी महायुती सरकारमधील एका XXडोक मंत्र्याने केली आणि पुन्हा वाद पेटला. या मागणीसाठी विहिंप, बजरंग दल आणि अशाच अनेक संघटनांनी सोमवारी राज्यात ठिकठिकाणी मोर्चे काढले, आंदोलने केलीत आणि त्याची परिणीती नागपूरच्या दंगलीत झाली. आता मुख्यमंत्री आणि राज्याचे गृहमंत्री एका विशिष्ट समाजावर खापर फोडत आहेत. औरंगजेबाच्या कबरीसारख्या क्षुल्लक मुद्यावर राजकारण करणाऱ्यांना नेमके साधायचे काय?

-----------------






काही महिन्यांपूर्वी छावा चित्रपट आला आणि ४०० वर्षापूर्वी गाडल्या गेलेल्या औरंगजेबाचा जिवंत करण्यात आले. काही दिवसांपूर्वी समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबाचे गोडवे गायले, त्याच्या कार्याची महती सांगितली, त्याचा पराक्रम विशद केला आणि इथूनच एका नव्या वादाला तोंड फुटले.

मराठवाड्याच्या खुलताबाद येथील औरंगजेबाच्या कबरीवर कोण जातात? तेथे कोण नतमस्तक होतात? याचेशी सर्वसामान्य मराठी माणसांना काय घेणे देणे? औरंगजेबाची कबर हटवा, अशी मागणी करणारे आग्र्याच्या ताजमहाल हटवा, या देशातील कुतूबमिनार, चारमिनार, लाल किला वगैरे वास्तू सुद्धा पाडून टाका, अशी मागणी करणार आहेत का?

जातीय तेढ निर्माण करणे, धार्मिक वाद उफाळून येईल, अशा कृती आणि वक्तव्य करण्याचा ठपका काही संघटनांवर याआधीही ठेवला गेला आणि आताही ठेवला जातो आहे. परंतु, गेल्या काही वर्षात कोकणातील एक लोकप्रतिनिधी सातत्याने अशी सामाजिक सौहार्द बिघडवणारी वक्तव्ये करतो आणि त्याच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते, मंत्री शांत बसतात, त्याला समज देत नाही. यावरून पाणी कुठे मुरते आहे? हे लक्षात यावे.

स्वराज्यावर वाकडी नजर टाकणारा, छत्रपती संभाजी राजांचा अनन्वीत छळ करून त्यांना ठार मारणारा औरंग्या कुठे आहे? तो शाळेच्या पाठ्यपुस्तकात नाही, आपल्या मराठीजनांच्या मनात नाही, भिंतीवर नाही किंवा चौकातील कुठल्याही बॅनरवर नाही. तो कधीचाच नष्ट झाला. त्याला जिवंत करतेय कोण?

औरंगजेबाची कबर नष्ट करण्याच्या मागणीला घेवून आंदोलन करण्याचा विषय काही एका दिवसात ठरला नसेल. त्यासाठी गुप्त खलबते झाली असतील, कोणी कुठे आणि कसे आंदोलन करायचे? याचे नियोजन झाले असेल. पण, ज्या विषयाशी सामान्यजणांना काही घेणेदेणे नाही त्या विषयाला घेवून आंदोलन करण्याची गरज ती काय? आणि या आंदोलनाला परवानगी दिलीच कशी जाते?

नागपुरात सोमवारी आंदोलन झाले, त्याची प्रतिक्रिया काही वेळातच उमटली. तूफान दगडफेक झाली, जाळपोळ केल्या गेली, अनेक गाड्या जाळल्या, पोलीस अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले. लक्षावधीच्या मालमत्तेचे नुकसान झाले. असले बिनकामाचे मुद्दे या उपटसुंभांनी एकरून काढायचे, त्यातून वाद निर्माण करायचा आणि जखमा बिचाऱ्या आमच्या पोलीसवाल्यांनी सहन करायच्या.

खरेच राज्यात सगळेकाही ऑलबेल आहे का? शेतकरी आत्महत्या करीत नाही, बेरोजगार नोकरीसाठी भटकत नाहीत, गुन्हेगारीवर आळा बसला आहे, कुठेच बलात्कार आणि खून होत नाही, चोऱ्या, मारामाऱ्या तर बंदच झाल्यात, अशी स्थिती दिसते आहे का? मग, या सर्व समस्यांकडे कानाडोळा करून औरंग्याची कबर, हा फालतू विषय घ्यायचाच कशाला? विस्मृतीत गेलेल्या त्या औरंग्याला पुन्हा पुन्हा जिवंत करायचे कशाला?

राज्यात गेल्या काही महिन्यात अनेक मोठ्या घटना घडल्या. बिडचे प्रकरण तर अतिभयंकर आहे. वाल्मिक कराड आतमध्ये गेला. धनंजय मुंडे घरी बसवला गेला. याच बिडची एकना एक प्रकरणे समोर येत आहेत. कदाचित, या सर्व प्रकरणावरून लोकांचे लक्ष विचलीत करण्यासाठी, आपले पाप झाकण्यासाठी तर औरंग्याच्या कबरीचा विषय उकरून काढला जात नसावा?

नागपूरच्या दंगलीवरून आता एकमेकावर आरोप प्रत्यारोप सुरू झाले आहेत. विरोधकांनी टीकेचा भडीमार चालविला आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी तर ही दंगल आणि अशा घटनेसाठी एकप्रकारे राज्य सरकारच जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्र सरकारमधील एक विषारी मंत्री दररोज खुलेआमपणे द्वेष पसरवण्याचा व दुही पिकवण्याचे काम करत असल्याचे ते म्हणतात आणि त्यात तथ्यही आहे. या मंत्र्यांनी तोंड बंद ठेवले तरी या राज्यातील स्थिती सामान्य होवू शकते. त्यामुळे विष ओकणे थांबवा.

●●●●

# शिवप्रभू आचरणातही दिसावेत!

तिथीनुसार शिवजयंती नुकतीच पार पडली. त्याआधी १९ फेब्रुवारीला तारखेनुसार शिवजयंती साजरी करण्यात आली. तारखेनुसार आणि तिथीनुसार तितक्याच जल्लोषात जयंती साजरी केले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज हे जगाच्या पाठीवरील एकमेव राजे आहेत.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा राज्यातील प्रत्येकालाच सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यांसारख्या शिवोत्सवांना अधिक उफाळून येतो. प्रतिदिन घरात शिवरायांची मूर्ती अथवा प्रतिमा पुजण्याचा आणि घराबाहेर पडताना तिला मुजरा करण्याचा नित्यक्रम आजही अनेक घरांतून पाळला जातो. आपण शिवरायांचे पाईक आहोत याची जाण ठेवण्यासाठी कपाळावर चंद्रकोर लावणारे अनेक तरुण मुंबईसारख्या धावपळीच्या शहरातही ठिकठिकाणी पाहायला मिळतात.

चारचाकी, तीनचाकी गाडीवर मागच्या बाजूला तर दुचाकीच्या दर्शनी भागावर छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले स्टिकर आणि भगवे ध्वज लावलेल्या गाड्या राज्यातील रस्त्यांवर सर्वत्रच पाहायला मिळतात. पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात गेल्यावर तेथील नागरिकांनी आपल्या बंगल्यांची, घरांची नावे ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अनुसरून किंवा गडदुर्गांच्या नावाने ठेवलेली पाहायला मिळतात. गळ्यात शिवरायांच्या चित्रांचे, शिवमुद्रांचे लॉकेट्स घालणारे, खिशाला महाराजांच्या चित्राचा बॅच लावणारे आणि महाराजांच्या चित्रांचे किचैन बाळगणारे राज्यात सर्वत्रच पाहायला मिळतात. हल्ली तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दाढी आणि मिशी बाळगण्याची फॅशन तरुणवर्गात रूढ होत चालली आहे.

शिवरायांप्रतीच्या श्रद्धेपोटी हे सर्व करणाऱ्या तरुणवर्गाच्या मनामध्ये शिवरायांप्रती प्रचंड आदर आणि आस्था असते यात दुमत नाही; मात्र मनातील आदर कृतीत आणण्यामध्ये आजचा तरुण कुठेतरी कमी पडत आहे. ट्रेन-बसच्या प्रवासात, रहदारीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांसारखी दाढी मिशी कोरणारे आणि कपाळावर चंद्रकोर रेखाटणारे अनेक तरुण आपापसांत बोलताना शिव्यांचा आणि अपशब्दांचा वापर करताना आढळतात.

जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

स्वतःला शिवभक्त म्हणवून घेणारे अनेक जण वाहतूक पोलिसांशी किंवा अन्य वाहनचालकाशी अरेरावी करताना किंवा वाद घालताना दिसून येतात. गाडीवर लावलेल्या स्टिकरच्या रूपाने आपल्यासोबत महाराजही आहेत आणि त्यांचे आपल्या प्रत्येक कृतीकडे बारीक लक्ष आहे हा भाव आपल्यात का निर्माण होत नाही?

जेव्हा आपण आपल्या गाडीवर महाराजांच्या प्रतिमेचे स्टिकर लावतो, गळ्यात शिवप्रतिमा परिधान करतो, कपाळावर चंद्रकोर लावतो आणि महाराजांसारखी दाढी मिशी ठेवतो तेव्हा या सर्वांसोबत आपली जबाबदारीही वाढते हे लक्षात घेतले पाहिजे.

आपल्या प्रत्येक कृतीमधून शिवरायांच्या शिकवणुकीचा आदर्श दिसून यायला हवा. उपरोक्त गोष्टी परिधान करून आपण कार्यालयांत भ्रष्टाचार करत असू, गाडीवर महाराजांचे स्टिकर लावून वाहतुकीचे नियम पळत नसू, इतरांशी विनाकारण वाद घालत असू, घरी आई वडिलांचा आदर करत नसू, मुखातून अपशब्द उच्चारात असू तर समाज आपल्याकडे हीन दृष्टीने पाहिलच.

शिवाय प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचाही आपल्याकडून अवमान घडेल हे लक्षात घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे. शिवरायांसारखे दिसणे, शिवप्रेमाचा देखावा करणे जेव्हढे सोपे आहे तेव्हढेच कठीण शिवरायांचा आदर्श कृतीत आणणे म्हणजेच शिवरायांना अपेक्षित अशी कृती करणे आहे. त्यामुळे आपल्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी.

आपल्या प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे त्यामुळे छत्रपतींचा आदर्श आपल्या नियमित आचरणातूनही वेळोवेळी दिसायला हवा!

■ ■ ■

# मुंग्यांचे व्यक्तिमत्व, विद्यार्थ्यांना प्रेरणादायी

मुंग्या, जरी साधारण दिसत असल्या तरी, प्राणी जगातल्या अतिशय अद्भुत प्राण्यांपैकी एक आहे. त्या विद्यार्थ्यांसाठी अनेक अमूल्य धडे देतात, जसे की सांघिक कार्य, शिस्त, सातत्य, नेतृत्व आणि नवकल्पना. आकाराने लहान असल्या तरी मुंग्यांमध्ये अनेक असामान्य गुणधर्म आहेत, जे मानवाला त्यांच्या वैयक्तिक आणि शैक्षणिक जीवनात अधिक प्रभावीपणे काम करण्याची प्रेरणा देतात. यश आणि महानता हे सतत परिश्रम आणि सहकार्यातून मिळते, याची जाणीवच जणू मुंग्या आपल्याला करून देतात.

**शिस्त आणि संघटन**

मुंग्या सांघिक कार्याद्वारे उत्कृष्ट कामगिरी करतात, प्रत्येक सदस्य विशिष्ट भूमिका बजावतो आणि वैयक्तिक ओळख न देता योगदान देतात. हा सामूहिक प्रयत्न त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे किंबहुना प्रत्येकाची मिळणारी एकत्रित कार्यक्षमता त्यांच्या यशाचा मुख्य आधार बनते.

विद्यार्थ्यांसाठी, समूह प्रकल्प आणि भविष्यातील व्यावसायिक जीवनात सांघिक कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मुंग्यांप्रमाणे, विद्यार्थी एकमेकांच्या भूमिका समजून आणि त्यांचा आदर करून अधिक प्रभावीपणे कार्य करू शकतात.

गट प्रकल्पांमध्ये, प्रत्येक सदस्याला त्याच्या विशेष कौशल्यांचा वापर करून योगदान देण्याची संधी मिळते, ज्यामुळे कायार्ची गुणवत्ता आणि कार्यक्षमतेत वाढ होते. सांघिक कार्य विद्यार्थ्यांना एकत्र काम करून सामूहिक उद्दिष्ट साध्य करण्याची संधी प्रदान करते, ज्यामुळे न फक्त मोठ्या प्रकल्पांची यशस्वी पूर्तता होते, तर लहान योगदान देखील मोठ्या यशात महत्त्वपूर्ण ठरते.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून, एकत्र काम केल्याने प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक, सर्जनशील आणि शारीरिक क्षमता वर्धित होतात आणि त्यामुळे त्यांचे एकत्रित कार्य अधिक परिणामकारक ठरते.

**आव्हानांवर मात करण्याची किमया**

मुंग्या सातत्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. जर एक मुंगी अडचणीला सामोरे जाते, तर ती हार मानत नाही. ती चुकत-चुकत, नवीन मार्ग शोधत आपल्या उद्दीष्टांपर्यंत पोहोचते. विद्यार्थ्यांसाठी, ही शिकवण खूप महत्त्वाची आहे. शैक्षणिक जीवनात अनेक वेळा अडचणी येतात, पण त्यांच्याशी झुंज देत, जिद्द आणि सातत्याने प्रयत्न करत यश मिळवता येते.

**प्रभावी संवाद**

फेरोमोन (रासायनिक संकेत) वापरून एकमेकांशी संवाद साधणाऱ्या मुंग्यांमध्ये अन्नाचे स्रोत, धोके किंवा पर्यावरणातील बदल याबद्दल माहिती सहजपणे प्रसारित केली जाते.

या संकेताचा वापर अत्यंत प्रभावी असतो, कारण त्यातून त्या एकमेकांच्या हालचालींचा समन्वय साधतात आणि त्यानुसार प्रभावी योजना तयार करतात. विद्यार्थ्यांसाठी, प्रभावी संवाद म्हणजे केवळ शब्दांद्वारेच नव्हे, तर नॉन-वर्बल संकेत, शारीरिक भाषा आणि ऐकण्याची क्षमता वापरून संवाद साधणे. मुंग्यांप्रमाणे, विद्यार्थी देखील स्पष्ट विचार मांडून, सहकार्य करून आणि इतरांचे विचार ऐकून अधिक प्रभावीपणे संवाद साधू शकतात, ज्यामुळे ते अधिक यशस्वी होऊ होतात.

**नेतृत्व आणि जबाबदारी**

नेतृत्व फक्त सत्ता नसून, एक जबाबदारी आहे हे मुंग्यांकडून विज्ञानात्मक दृष्टिकोनातून स्पष्टपणे दिसून येते. राणी मुंगी वसाहतीच्या आरोग्याची काळजी घेत असली तरी, काम करणाऱ्या मुंग्या (वर्कर अँट्स) इतरांना मार्गदर्शन करतात आणि सामूहिक कार्यासाठी निर्णय घेत पुढाकार घेतात.

काम करणाऱ्या मुंग्यांमध्ये अनेक विशिष्ट कार्ये असतात, जसे की अन्न गोळा करणे, वसाहतीचे संरक्षण करणे आणि वयस्कर मुंग्यांची देखभाल करणे. हे सर्व कार्य एकत्र येऊन वसाहतीच्या यशस्वीतेची आणि टिकावाची खात्री करतात. वैज्ञानिक दृष्टिकोनातून, या काम करणाऱ्या मुंग्यांचे नेतृत्व कौशल्य दिसून येते, कारण ते कोणत्याही नेतृत्वात्मक भूमिकेतील व्यक्तीप्रमाणे न केवळ कार्यांचे समन्वय साधतात, तर इतरांना प्रेरणा देऊन सामूहिक यशासाठी आवश्यक निर्णय घेतात.

विद्यार्थ्यांसाठी, हे खरे नेतृत्व आहे– कधीकधी प्राधिकृत भूमिका नसताना, इतरांची मदत करणे, गटाच्या उद्दीष्टांसाठी कार्य करणे आणि एकत्रितपणे यश प्राप्त करणे.





डॉ. देवश्री आनंद नगरकर
सहाय्यक प्राध्यापक
प्राणीशास्त्र विभाग
एल. ए. डी. श्रीमती आर. पी. कॉलेज (महिलांसाठी) नागपूर.
9730045438

**समस्यांचे समाधान आणि नवकल्पना**

मुंग्या समस्यांचे निराकरण सहजपणे करतात. जर त्यांना अडचण आली, तर नवीन मार्ग शोधतात. त्यांच्या सर्जनशीलतेचे आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य त्यांच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. काम करणाऱ्या मुंग्यांच्या प्रयत्नांमध्ये अडथळ्यांवर मात करणे आणि दुसऱ्या मुंग्यांना मार्गदर्शन करणे यांसारख्या कार्यांचा समावेश असतो.

या प्रक्रियेतील अचूक समन्वय आणि अभिनवतेमुळे वसाहतीचे कार्य सुरळीतपणे चालते. विद्यार्थ्यांसाठी हा एक महत्त्वाचे धडा आहे. आव्हाने येतातच, पण त्यावर विचारपूर्वक, सर्जनशीलतेने आणि नवनव्या पद्धतीने मात करता येते.

**निसर्गाशी संतुलन**

मुंग्या पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. मातीला हवेची संचार प्रक्रिया (aeration) पुरवणे, ज्यामुळे मातीतील पोषणतत्त्वांचे पुनर्वापर (nutrient recycling) सुलभ होते. तसेच, मुंग्या नैसर्गिक कीटक नियंत्रणातही मदत करतात, ज्यामुळे कीटकनाशकांचा वापर कमी होतो आणि पर्यावरणावर होणारा परिणाम मर्यादेत राहतो. विद्यार्थ्यांसाठी, मुंग्यांचे हे पर्यावरणीय कार्य म्हणजे सातत्येचा आदर्शच आहे. पर्यावरणाची काळजी घेणे, कचरा कमी करणे, ऊर्जा वाचवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा विवेकपूर्ण वापर करणे हे विशेष गुणधर्म दिसून येतात.

**परिवर्तनाशी जुळवून घेणे**

बदल एक अपरिहार्य गोष्ट आहे. नवीन तंत्रज्ञान, बदलत्या शिक्षण पद्धती आणि जागतिक स्तरावर बदल हे सर्व विद्यार्थ्यांना अनुकूल होण्याची आवश्यकता आहे. लवचिक राहून आणि बदलांना सामोरे जात, ते त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होऊ शकतात.

मुंग्या ह्या अत्यंत अनुकूल असतात. जेव्हा अन्नाचा स्त्रोत संपतो, तेव्हा त्यांना पर्यावरणातील बदलांनुसार इतर मार्ग शोधावे लागतात आणि यामुळेच त्यांचे अस्तित्व कायम आहे.

**सततं कर्म कृत्वा साधयेत् स्वं लक्ष्यम्।**

कर्तव्य सातत्याने केल्याने, व्यक्ती आपले ध्येय साध्य करू शकते. मुंग्या अडथळ्यांना न जुमानता अन्न गोळा करण्यासाठी आणि वसाहती तयार करण्याच्या त्यांच्या दैनंदिन प्रयत्नांतून चिकाटी, सांघिक कार्य आणि शिस्त दाखवतात. त्याचप्रमाणे, विद्यार्थी मुंग्यांकडून मौल्यवान धडे शिकू शकतात, ध्येय साध्य करण्यासाठी दृढनिश्चय, संवाद, नेतृत्व आणि अनुकूलता यासारख्या गुणांचा अवलंब करू शकतात. एकूणच मुंग्यांच्या विविध पैलूंचा अभ्यास केल्यास त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणारी, विलक्षण प्रेरणादायी आहे असे दिसून येते.

■ ■ ■

# आतापासूनच उन्हाचे चटके, पाणी टंचाई... पुढे काय?

राज्यासह देशातील वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, वाढते वाहतूकीचे प्रमाण, सिमेंटीकरण, मोठ्या प्रमाणात जंगलतोड यामुळे हवामानात दिवसेंदिवस आमुलाग्र बदल होत आहे. या बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती दिवसेंदिवस आक्राळ-विक्राळ रूप धारण करीत आहे. यामुळे मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांच्यापुढे अत्यंत गंभीर व चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे.

बदलत्या हवामानामुळे राज्यासह देशातील अनेक भागांत आतापासूनच उष्णतेची लाट पहायला मिळत आहे.ही राज्यासाठी व देशासाठी धोक्याचीच घंटा म्हणावी लागेल. यावरून स्पष्ट होते पुढील दिवस अत्यंत गंभीर रूप धारण करू शकतात.कारण आताच नागपूरचा पारा ४१.१ डिग्री सेल्सियसवर येवून पोहोचला आहे तर दुसरीकडे १३ मार्चला ब्रम्हपुरी येथे राज्यातील तसेच देशातील सर्वाधिक पारा ४२ अंश डिग्री सेल्सियस इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली. म्हणजेच आतापासून उष्णतामान वाढने पुढील दिवसांसाठी कठीणाई निर्माण करू शकते यालाही नाकारता येत नाही.

त्यामुळे बदलते हवामान व वाढते उष्णतामान पहाता सर्वांनीच सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.हवामान खात्याने हेही सांगितले आहे की पुढे चालून तापमानात कमी होण्याची संभावना नसल्याने स्पष्ट सांगितले आहे. कारण १३ व १४ मार्चला विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांना हीट वे ची चेतावणी देण्यात आलेली होती. म्हणजेच उष्णतेच्या बाबतीत पुढील काळ अत्यंत गंभीर असल्याचे दिसून येते. कारण होळीपुर्वीच गुजरात, महाराष्ट्र आणि राजस्थानमधील अनेक भाग उष्णतेच्या लाटेच्या तडाख्यात आहेत.

गुजरात- राजस्थान- महाराष्ट्रातील डझनभराहुन अधिक शहरांमध्ये तापमानाने ४० अंशाचा टप्पा ओलांडला आहे. यावरून आपण समजू शकतो की पुढील काळ अत्यंत कठीण व बिकट परिस्थिती निर्माण करू शकते याला नाकारता येत नाही.सध्याच्या परिस्थितीत उष्णता वाढल्याने युवा वर्ग नदी, तलाव याठिकाणी मौजमस्ती करण्यासाठी जातात व ज्यांना पोहता येत नाही अशे युवक-युवती नदी किंवा तलावात उतरण्याचा प्रयत्न करतात.

अशावेळी मोठी दुर्घटना होऊ शकते आणि होत आहे. त्यामुळे युवकांनी नदी-तलाव यापासून सावधगिरी बाळगुन दुर रहावे कारण कोणतीही दुर्घटना सांगुन येत नाही ती केव्हाही कधीही होऊ शकते. त्यामुळे अशा दुर्घटनांपासुन वेळीच स्वतःला सावरले पाहिजे.

रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
नागपूर. ९९२१६९०७७९

तापमान वाढल्याने आगीच्याही घटनांमध्ये सुध्दा वाढ झाल्याचे दिसून येते. आतापासुन निर्माण झालेले वाढते उष्णतामान हळूहळू पाण्याच्या समस्येकडे वाटचाल करीत आहे आणि याचा फटका थोड्याच दिवसात आपणा सर्वांना भोगावा लागु शकतो यालाही नाकारता येत नाही. वाढत्या उष्णतामानामुळे त्वचेचा आजार किंवा अन्य आजाराचा धोका निर्माण होऊ शकतो. याकरीता आतापासूनच वाढते उष्णतामान पहाता स्वतःची काळजी स्वतःच घेतली पाहिजे.

घराच्या बाहेर निघतांना कानाला व डोक्याला दुपट्टा बांधुनच निघावे, पाणी जास्तीत जास्त प्यावे व उष्णतेपासून स्वतःचा जेवढा बचाव करता येईल तेवढा बचाव अवश्य केला पाहिजे. कारण बदलत्या हवामानामुळे यावर्षी उष्णतेचे प्रमाण जास्त राहा०ण्याची शक्यता हवामान खात्याकडुन वर्तवली जात आहे आणि त्याची सुरुवात वेळेच्या आधी झाल्याने मानव, पशुपक्षी व अन्य जीवजंतू यांना आतापासूनच त्याची झळ सोसावी लागत आहे. त्यामुळे सावधान वाढत्या उष्णतेपासून स्वतःही सुरक्षित रहा व पशुपक्षांनाही सुरक्षित ठेवा.

मार्च महिन्याच्या मध्यातच उन्हाच्या झळा तीव्र होत असल्याने पाण्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. राज्यात दमदार पाऊसामुळे नद्या, तलाव, धरणात आक्टोंबर महिन्यात मुबलक पाणी साठा जमा झाले होते म्हणजेच ८८ टक्के जलसाठा होता. ही मागील पाच वर्षातील मोठी वाढ मानली जात होती. परंतु वाढते उष्णतामान पाहता जलसाठा दिवसेंदिवस कमी कमी होत आहे ही चिंताजनक बाब आहे.

मागील पाच महिन्यांत राज्यातील जलसाठ्यात ३५ टक्क्यांनी घट होऊन ५२.७१ टक्यावर आला आहे. सध्याच्या परिस्थितीत जलसाठा कोकण ५७.६३ टक्के, मराठवाडा ५१.११ टक्के, नागपूर ४८.८३ टक्के, अमरावती ५७.३९ टक्के, नाशिक ५२.८९ टक्के, पुणे ५२.२२ टक्के इतका जलसाठा राज्यातील मुख्य धरणांमध्ये शिल्लक आहे.

पाण्याची कठीण परिस्थिती पाहता राज्यातील कोकण व पुण्यातील दहा गावांना व ९५ वाड्यांना टॅंकरने पाणीपुरवठा केला जात आहे यावरून आपण समजू शकतो की पुढील काळ अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण करू शकते. त्यामुळे पाण्याच्या बाबतीत सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.

दरम्यान आगामी काळातील वाढते उष्णतामान, पाण्याची मागणी, बाष्पीभवनाचा वेग बघता पाणी टंचाई अत्यंत गडद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याकरीता सरकारने ताबडतोब नियोजन करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे वाढते उष्णतामान पहाता सर्वांनीच सावधगिरी बाळगुन आरोग्याची काळजी घ्यावी.

■ ■ ■

## उन्हाळ्यात कोणत्या मडक्यातील पाणी पिणे आरोग्यासाठी ठरेल फायदेशीर?

# लाल, काळा की पांढरा?



उन्हाळ्याला सुरुवात झाली आहे. उन्हाळ्यामध्ये अनेकांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. उन्हाळ्यात तिव्र सूर्यप्रकाशामुळे तुम्हाला उष्मघाताच्या आणि चक्कर येण्याच्या समस्या होऊ शकतात. वाढलेल्या उष्णतेमुळे तुमच्या शरीरामधील पाणी कमी करते.

उन्हाळ्यात निरोगी शरीरासाठी तुमच्या शरीराला हायड्रेटेड ठेवणे गरजेचे असते. अनेकांना वाढलेल्या उष्णतेमुळे थंड पाणी पिण्याची सवय असते. अनेकजण रेफ्रिजरेटरच्या पाण्यापेक्षा पारंपारिक मातीच्या भांड्यातील पाणी पिण्यास पसंती देतात. त्या कारणामुळे उन्हाळ्यात अनेकजण बाजारातून मातीची भांडी आणि मडके घरी आणतात. परंतु तुम्हाला माहिती असेल की बाजारामध्ये तीन प्रकारचे मातीची भांडी उपलब्ध आहेत. अनेकवेळा तुम्हाला लाल मातीची किंवा काळ्या माती पासून बनलेल्या मडक्यांचा वापर केला जातो.

अनेक वर्षापासून भारताच्या विविध भागांमध्ये मडक्याचा पाणी साठवण्यासाठी वापर केला जात होता. मडक्याच्या वापरामुळे पाणी नैसर्गिकरित्या थंड होते. त्यासोबतच मडक्यातून पाणी पिण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे देखील आहेत.

आहारतज्ज्ञ म्हणतात की, सध्या उष्णता वाढली आहे आणि बाजारात मातीच्या भांड्यांची दुकाने सजली आहेत. वेगवेगळ्या आकारांसोबतच, वेगवेगळ्या रंगांचे भांडे देखील दिसतात. बऱ्याच ठिकाणी काळ्या आणि लाल रंगाच्या भांड्यांसह पांढरी भांडी देखील दिसतात. तर, तुम्ही कोणता भांडे खरेदी करावा? याबद्दल अनेकदा गोंधळ होतो. पण, कोणत्या मातीच्या भांड्याचा वापर करणे फायदेशीर आहे.

(उर्वरीत माहिती उद्याच्या अंकात)

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### शितला माता संदेश

शितला मातेच्या पूजेला
नैवेद्य शिळ्या सैपाकाचा
शरीर तापमान वाढू देऊनये
संदेश हा असे त्यांचा ...

शितल ठेवा डोके
शितल ठेवा विचार
टळतील संभाव्य विघ्ने
जीवनात येईल बहार ...

शिघ्र तापते ते लोखंड
ताऊन निघते ते गोल्ड
म्हणून छोट्या बाबींवर
भडकणे तू आता सोड ..!

# तिवस्यातील एटीएम फोडणारे परप्रांतीय गजाआड

हरियाणातून दोघांना अटक ■ स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांची कारवाई





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.18 )** - स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तिवसा शहरातील एस.बी.आय. बँकेचे ए.टि.एम. फोडून पसार होणार्या दोन आरोपींना 17 मार्च रोजी हरीयाणा राज्यातुन अटक केली. आमीरखान अख्तर खान (35, रा. मोहमदपुर अहीर, ता. तावडु, जि. नुह (हरीयाणा) व जुबेर अल्लाहदीया (32, रा. रुबड मोहल्ला, धौज, ता. थौज जि. फरीदाबाद (हरीयाणा) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून 8 लाख 10 हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.


26 फेब्रुवारी रोजी तिवसा पोलिस ठाण्यात अल्पेश रमेशराव तांबुसकर (36, रा. रा.स्वागत नगर, नागपुर) यांनी तक्रार दिली कि, तिवसा शहरातील एस. बी. आय. बँकेच इमारतीमध्ये एस. बी. आय. बँकेचे ए.टि.एम.मशीन गॅस कटरचे साहाय्याने फोडुन चोराने ए.टी.एम. मधील नगदी 4 लाख 80 हजार रुपये चोरुन नेले. दरम्यान एटीएमला आग लागली आणि एटीएम मशिन जळून खाक झाला. या तक्रारीवरुन तिवसा पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुध्द भारतीय न्याय संहिता कलम 331 (4), 305 प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन केले आणि वेगवेगळे पथक तयार करुन सुचना निर्गमीत केल्या होत्या. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस करीत होते. दरम्यान पोलिसांनी बॅकेच्या एटीएममधील सि.सि.टी.व्ही. फुटेजच्या विश्लेषणावरुन तसेच मिळालेल्या गोपनीय माहीतीवरुन सदर गुन्हा हा हरीयाणा राज्यातील कुख्यात टोळीने केला असल्याचे समजले. या माहितीवरून पोलिस पथकाने 13 मार्च रोजी हरियाणातील मोहमदपुर अहीर येथे जाऊन सापळा रचला आणि या गुन्ह्यातील आरोपी आमीरखान अख्तर खान याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, प्रथम त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिली. परंतू पोलिसांनी कसून चौकशी केल्यानंतर त्याने सदर गुन्हा हा त्याच्या साथीदारासोबत केल्याची कबुली दिली. त्यामुळे पोलिसांनी आरोपीला अटक केली. आरोपी आमीरखान अख्तर खान याचे सांगण्यावरुन त्याने जुबेर याच्या मारुती स्विफट गाडीने साथीदारसह तिवसा येथे जावु[n] गुन्हा केला असल्याचे कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला हरियाणातील रुबड मोहल्ला येथे जाऊन दुसरा आरोपी नामे जुबेर अल्लाहदीयाला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, आमिर खान व जुबेर यांनी चारचाकी वापरून सदर ए.टी.एम. फोडुन रक्कम चोरी केली असल्याची माहिती पुढे आली. त्यामुळे पोलिसांनी 17 मार्च रोजी दोन्ही आरोपींना अटक केली. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यातील विना क्रमांकाची एक हुंडा[i] कंपनीची वरणा कार तसेच एक मोबाईल असा एकुण 8 लाख 10 हजाराचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी व मुद्देमाल तिवसा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. पुढील तपास तिवसा पोलिस करीत आहे. या गुन्ह्यातील इतर आरोपीतांचा शोध पोलिस घेत आहे. दोन्ही अटक आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना 20 मार्चपर्यंतची पोलिस कोठडी सुनावली आहे.

## या पथकाची कामगिरी

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सागर हटवार, मोहमद तसलीम, मुलचंद भांबुरकर, पोलीस अंमलदार अमोल देशमुख, बळवंत दाभने, रवीद्र बावणे, गजेंद्र ठाकरे, भुषण पेठे, मंगेश लकडे, सचीन मसांगे, पंकज फाटे, दिनेश कनोजीया संजय प्रधान, सुरेश पवार, सागर धापड, चेतन गुल्हाने, शिवा सिरसाठ यांनी केली.

# नागपूरच्या पार्श्वभूमिवर अमरावतीमध्ये हायअलर्ट

चौकाचौकात पोलिसांचा बंदोबस्त ■ शांतता राखण्याचे अमरावती पोलिसांकडून आवाहन






**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.18 )** - नागपुरात घडलेल्या दंगलीमुळे राज्यभरात खळबळ उडाली असून, अमरावती शहरात पोलिस यंत्रणा अलर्ट झाली आहे. अमरावती पोलीसांनीही खबरदारी म्हणून चौकाचौकात बंदोबस्त वाढविला असून, पोलिसांनी शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

नागपुर शहरात घडलेल्या घटनेच्या पार्श्वभुमीवर कोणत्याही समाजाच्या भावना दुखावणारे किंवा दोन धर्मामध्ये तेढ पसरविणारे आक्षेपार्ह मॅसेज, इमेजेस, व्हिडीओज् व माहितीची शहानिशा न करता व्हॉटसॲप, फेसबुक, व्टिट्र, इन्स्टाग्राम व इतर सोशल मिडीया माध्यमांवर पोस्ट प्रसारीत करू नये. कोणत्याही अफवा पसरवु नये. अशा कोणत्याही पोस्टमुळे दोन व्यक्ती, समाज, धर्म, पंथ अशांच्या भावना दुखावुन समाजात तणाव निर्माण होवून कोणतीही अनुचित घटना घडल्यास सदर पोस्ट करणार्या इसमांस गुन्हा करण्यास प्रवुत्त केल्याचे समजुन त्यावर कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे शहर पोलिसांनी कळविले आहे.

## तर ग्रुप ॲडमीनवर होणार कारवाई

नागपुर शहरातील झालेल्या घटनेच्या संदर्भाने खोटे मॅसेज व अफवा सोशल मिडीयावर पसरवीण्यास तसेच दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल करणाऱ्या व संबधीत ग्रुप ॲडमीन यांना जबाबदार धरण्यात येईल. असे कृत्य करणार्यास महाराष्ट्र पोलीस कायदा तसेच भारतीय न्याय संहीता प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. असा इशारा सर्व व्हॉटसॲप ॲडमीन यांना देण्यात आला आहे. आपण सर्वांनी अमरावती शहरामध्ये शांतता व सामाजिक सलोखा राखण्यासाठी पोलीस दलास सहकार्य करावे, असे आवाहन अमरावती पोलिसांनी केले आहे.

## समाजमाध्यमांवर करडी नजर

अमरावती शहरात संपुर्ण आयुक्तालयात सर्व ठिकाणी चोख बंदोबस्त नेमण्यात आलेला असून सर्व पोलीस दल सतर्क आहे. तसेच सोशल मिडीया मॉनीटरींग सेल स्थापन करण्यात आला असून सर्व व्हॉटसॲप, फेसबुक, व्टिट्र, इन्स्टाग्राम व इतर सोशल मिडीया माध्यमांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

## दारुची अवैध विक्री करताना पकडले

**अमरावती** - भानखेडा परिसरातील पाटीलचा वाडा यांच्या हॉटेलच्या मागील परिसरात दारुची अवैध विक्री करणार्या एका इसमाला बडनेरा पोलिसांनी 16 मार्च रोजी ताब्यात घेतले. याप्रकरणात बडनेरा पोलिस ठाण्यात पोलिस उपनिरीक्षक सुरेंद्र पाटील यांच्या तक्रारीवरून आरोपी चित्रकुट मंल पाटील (55, रा. यशोदानगर) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# औरंगजेबाचे कौतुक सहन करू शकत नाही - किरीट सोमय्या

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.18 )** - काही लोकांना औरंगजेबाला हिरो करायचे आहे. मात्र ही गोष्ट हिंदुस्थान आणि महाराष्ट्र कधीच सहनच करू शकत नाही,अशी प्रतिक्रिया भाजप नेते किरीट सोमय्या यांनी अमरावतीत (दि.18) दिली आहे. सध्या राज्यात औरंगजेबाच्या कबरीवरून सुरू असलेल्या वादावर ते माध्यमांशी बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले कि, मात्र सरकारी मंत्री असो किंवा सरकारी यंत्रणा असो त्यांनी सुद्धा थोडं नियंत्रण ठेवलं पाहिजे. औरंगजेब हा एक नंबरचा क्रूर होता हा इतिहास आहे. औरंगजेबाचं कोणी कौतुक करत असेल तर आम्ही सहन करू शकणार नाही. पण सरकारची काही बंधनं आहेत म्हणून त्या वास्तूचे रक्षण करावे लागत आहे,असेही ते म्हणाले. संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांच्या मनात औरंगजेबाबद्दल सहानुभूती आहे का? असा सवालही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरादाखल उपस्थित केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रत्येक भक्तांची, मग तो मंत्री का असे ना, त्याची इच्छा आहे की औरंगजेबाची कबर असता कामा नये. सरकारच्या काही मर्यादा असतात. ती जी काही वास्तू आहे त्याचं न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे जे काही व्हायचं ते होईल, पण तो पर्यंत सरकारने त्याची काळजी घ्यावी,असेही ते म्हणाले.



# धारणी पोलिसांनी 33 गोवंशांना दिले जीवनदान

## भोकरबर्डी येथे कारवाई





**महासागर प्रतिनिधी**
**धारणी,( दि.18 )** - धारणीपासून 14 किमी अंतरावर असलेल्या मध्यप्रदेश सीमेवर वसलेले भोकरबर्डी येथे गुप्त माहितीनुसार धारणी पोलिसांनी धाड टाकून 33 गोवंशांना पकडले.

प्राप्त माहितीनुसार धार्मिक पोलिसांना गुप्त माहिती नुसार 33 गोवंश मध्य प्रदेशातून दीड तलईवरून महाराष्ट्रात जात आहे. ही माहिती ठाणेदार अशोक जाधव यांना माहिती मिळताच त्यांनी आपल्या चमुना भोकरबरदी येथे तैनात करून कत्तली साठी क्रूरतेने नेत असलेल्या 33 गोवंशाना पकडुन त्यांना जीवनदान दिले. 33 गोवंश असून त्यांची किंमत अंदाजे सहा लक्ष पन्नास हजार इतकी आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या आदेशावरून ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सतीश झाल्टे, हंकारे, कासदेकर, राम सोळंके, मोहित आगाशे, कुंदन नंदवंशी, गजानन जामनेर, जीवन गोडंबे, सुजित वानखडे सुहास डहाके पोलीस अंमलदार मोहित आकाश यांच्या तक्रारीवरून पुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे 33 गोवंशांचे जीवन वाचले त्यामुळे तालुक्यातील गोरक्षकांनी आनंद व्यक्त केला आहे.

# बकऱ्या चोरी प्रकरणातील दोघांना अटक

## पाच गुन्ह्यांची कबुली

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.18 )** - बकऱ्या चोरी प्रकरणातील दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना 17 मार्च रोजी अटक केली. मोहित रामसिंग पवार (23) व अमिन सुनिल भोसले (21, दोन्ही रा. शेंदोळा (बु), ता. तिवसा) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून पाच गुन्हे उघडकीस आले आहे. पोलिस इतर पसार आरोपींचा शोध घेत आहे.

13 मार्च रोजी विजय हिम्मततराव धर्माळे (36, यावली) यांनी माऊली जहागिर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली कि, रात्री दरम्यान त्यांच्या टिनाच्या शेडमधून चार अनोळखी इसमांनी बकर्या चोरून नेल्या. त्यावेळी त्यांनी विरोध केला असता, आरोपींना त्यांना व त्यांच्या वडिलांना मारहाण केली. या तक्रारीवरून माऊली पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविला. सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलिस अधीक्षक विशाल आनंद स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारे दोन्ही आरोपींना अटक केली. पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली. आरोपींनी माऊली जहागिर, तळेगाव येथील दोन गुन्हे, वरुड व सरमसपुरा येतील एका गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली असून, आरोपींच्या तीन साथीदारांचा पोलिस शोध घेत आहे. आरोपींना माऊली जहागिर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## 60 हजाराचे जॅक पाईप लंपास

**अमरावती** - राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एमआयडीसी परिसरात सुरु असणार्या शेड बांधकाम स्थळावरून चोराने 60 हजार रुपये किमंतीचे लोखंडी पाईप लंपास केले. या घटनेची तक्रार शिवराज भास्करराव रिठे यांनी 16 मार्च रोजी राजापेठ पोलिस ठाण्यात दिली.

# महिलेकडून पैसे चोरणाऱ्याला अटक

## खोलापुरी गेट पोलिसांची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.18 )** - सराफा बाजार येथे खरेदी करण्याकरिता आलेल्या महिलेचे 10 हजार रुपये चोरी करणार्या एका आरोपीला खोलापुरी गेट पोलिसांनी 24 तासाचे आत अटक केली. किशोर मधुकरराव खडसे (वय 40 रा. वडाळी, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. या कारवाईमुळे खोलापुरी गेट पोलिसांची कौतुक होत आहे.

महिला सराफा बाजारात महिला खरेदीकरिता आली होती. त्यावेळी महिलेजवळील पैसे अज्ञात चोराने लंपास केले होते. या घटनेची माहिती महिलेने खोलापुरी गेट पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी गुप्त माहितीवरून आरोपी निष्पन्न करीत, त्याला चोविस तासात अटक केली. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भवर, पोलिस निरीक्षक गौतम पातारे व क्राईमचे पोलिस निरीक्षक होळकर यांचे मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक वैभव वंजारे, सहायक पोलिस उपनिरीक्षक प्रवीण खैरकर, पोलिस हवालदार राम लोखंडे, देवेंद्र कोठेकर, मंगेश भेलाये, इरफान, अमोल नकाशे व चालक प्रवीण परडखे यांनी केली. पोलिसांनी अटक आरोपी किशोर मधुकरराव खडसे याच्या ताब्यातून चोरीची रक्कम जप्त केली. डी.बी.पथक यांनी महत्वाच्या शिवजयंती बंदोबस्त पार पाडून बरेच परिश्रम घेऊन हा गुन्हा उघडकीस आणला आहे. त्यामुळे खोलापुरी गेट पोलिसांची सर्वत्र कौतुक होत आहे.

# जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावर बच्चू कडू कायम

## उच्च न्यायालयाचा दिलासा






**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.18 )**- मुंबई उच्च न्यायालयाने अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांना आज मोठा दिलासा देताना त्यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेली अपात्रता याचिका फेटाळली आहे. त्यामुळे आता बच्चू कडू हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून कायम राहणार आहेत. दिव्यांगासाठी आंदोलन केल्याप्रकरणी बच्चू कडू यांना स्थानिक न्यायालयाने 2 वर्षांची शिक्षा सुनावली होती. अशा स्थितीत बच्चू कडू यांना शिक्षा झाल्याचा मुद्दा उपस्थित करत जिल्हा बँकेच्या विरोधी संचालकांनी त्यांना बँकेच्या अध्यक्षपदी राहण्यास अपात्र घोषित करण्याच्या मागणीसह या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. जिथे सुनावणीनंतर उच्च न्यायालयाने विरोधी संचालकांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली आणि बच्चू कडू यांच्या विरोधात अपात्रतेचा कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, असे स्पष्ट केले. अशा परिस्थितीत उच्च न्यायालयाचा हा निर्णय बच्चू कडू यांना मोठा दिलासा मानला जात आहे. या निर्णयावर आपली प्रतिक्रिया देताना बच्चू कडू म्हणाले की, न्यायालयाच्या निर्णयाने आता सत्याचा विजय झाला असून त्यांना पदावरून हटवण्याचे विरोधकांचे मनसुबे उधळून लावले आहेत.

# निरामय

दिवसभराची धांदल, कामाचा ताण आणि खाण्यापिण्याच्या खराब सवयींचा आपल्या हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळेच हल्ली हृदयविकाराच्या झटक्यासारख्या घटना अचानक ऐकायला मिळत आहेत. हृदयविकाराचा झटका टाळण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे हृदयाचे ऐकणे आणि त्याचे संकेत समजून घेणे.



## हृदयविकाराचे 'हे' संकेत दुर्लक्षणे पडेल महागात

लाईफस्टाईल
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

हृदयविकाराचा झटका कधीच अचानक येत नाही. शरीर त्याच्या आगमनाच्या सुमारे एक महिना आधी सिग्नल देऊ लागते. हे समजून घेतल्यास ही जीवघेणी स्थिती टाळता येईल. याबाबत पुढील सात लक्षणांकडे चुकूनही दुर्लक्ष करू नये.

**इशारा देणारी लक्षणे**

*** छातीत सौम्य वेदना किंवा जडपणा**

तुम्हाला वारंवार हलके दुखत असेल किंवा छातीत जडपणा येत असेल, जळजळ किंवा दाब जाणवत असेल तर ते हलक्यात घेऊ नका. हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी, धमन्या हळूहळू ब्लॉक होऊ लागतात. त्यामुळे छातीत समस्या उद्भवू शकतात. काही वेळा ही वेदना खांदे, जबडा, मान आणि पाठीवरही पोहोचते. अशी लक्षणे दिसल्यास त्वरित तपासणी करून घ्यावी.

*** थकवा आणि अशक्तपणा**

काम न करता थकवा जाणवत असेल तर काळजी घ्या. कारण ही हृदयाच्या कमकुवतपणाची लक्षणे असू शकतात. हृदय शरीराच्या इतर भागांमध्ये पुरेसे ऑक्सिजनयुक्त रक्त पोहोचवू शकत नाही, तेव्हा शरीर लवकर थकते. हे लक्षण स्त्रियांमध्ये जास्त दिसून येते.

*** श्वास घेण्यात समस्या**

हलके चालल्यानंतर, पायऱ्या चढून किंवा एखादे काम केल्यावरही श्वास घेण्यास त्रास होत असेल, तर हेदेखील धोकादायक लक्षण असू शकते. यामध्ये हृदय योग्यरित्या रक्त पंप करू शकत नाही. अशा प्रसंगी फुफ्फुसात ऑक्सिजनची कमतरता असण्याकडे दुर्लक्ष करता कामा नये.

*** अस्वस्थ झोप**

रात्रीची झोप वारंवार हरवत असेल, विनाकारण अस्वस्थ वाटत असेल किंवा अचानक भीती वाटत असेल तर सावध व्हा. कारण हा हृदयविकाराचा इशारा असू शकतो. अनेक वेळा लोक या समस्यांना तणाव मानून दुर्लक्ष करतात; परंतु रक्तवाहिन्या अरुंद झाल्यामुळे असे होऊ शकते.

*** विनाकारण घाम येणे**

थंडी किंवा सामान्य हवामानातही जास्त घाम येणे हृदयविकाराचे लक्षण असू शकते. रक्त पंप करण्यात अडचण येते आणि जास्त काम करावे लागते, तेव्हा आपल्याला जास्त घाम येतो. असे झाल्यास ताबडतोब डॉक्टरांकडे जावे.



*** चक्कर येणे, डोके हलके होणे**

कोणत्याही कारणाशिवाय चक्कर येत असेल किंवा डोके हलके वाटत असेल तर ते कम कुवत हृदयाचे लक्षण असू शकते. हृदय शरीराच्या इतर भागांना योग्यरित्या रक्तपुरवठा करू शकत नाही, तेव्हा मेंदूमध्ये ऑक्सिजनची कमतरता असते. त्यामुळे ही समस्या निर्माण होते.

*** पोटदुखी, अपचन किंवा उलट्यासारखे वाटणे**

हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी काही लोकांना गॅस, अपचन, उलट्या किंवा पोटदुखी यासारख्या समस्या जाणवू शकतात. महिलांमध्ये या समस्या अधिक दिसतात. अशा समस्या उद्भवल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.



## मद्यपींमध्ये अल्कोहोलिक न्यूरोपॅथीची समस्या

आरोग्यभान
डॉ. महेश दळे

प्रमाणाबाहेर दारू पिणे हानिकारक आहे. अनेक संशोधनांमधूनही हे सिद्ध झाले आहे; पण दारू पिणाऱ्यांची संख्या कमी होत नाही. 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज'ने भौगोलिक प्रदेश, वय आणि लिंग या आधारावर २०४ देशांमध्ये मद्यपान करणाऱ्यांवर संशोधन केले. त्यात आढळून आले की १५ ते ३९ वर्षे वयोगटातील लोकांना मद्यपानामुळे सर्वाधिक धोका संभवतो. दारू अनेक आजारांना जन्म देऊ शकते. यामध्ये कर्करोगाचाही समावेश होतो. दारू पिण्याच्या दिवशीच अनेक समस्या उद्भवतात असे नाही, तर दुसऱ्या दिवशीही पायांमध्ये तीव्र वेदना होऊ शकतात. हे दुखणे कधीही हलक्यात घेऊ नये, कारण ही एक गंभीर समस्या असू शकते.

**दारू पिल्याने पाय का दुखतात?**

जास्त मद्यपान केल्याने अल्कोहोलिक न्यूरोपॅथीची समस्या उद्भवू शकते. यामुळे मेंदूशी जोडलेल्या मज्जासंस्थेला गंभीर नुकसान होते. या समस्येमध्ये, हात आणि पाय हलवण्यास त्रास होतो. मूत्राशय आणि आतड्यांमध्येही समस्या उद्भवू शकतात. अल्कोहोलमुळे काही नसादेखील खराब होऊ शकतात.

**अल्कोहोलिक न्यूरोपॅथीची लक्षणे?**

शरीराच्या खालच्या भागात वेदना, पायामध्ये सतत वेदना, मुंग्या येणे, पिन आणि सुया जाणवणे (पॅरेस्थेसिया) स्नायूंमध्ये पेटके येणे आणि कमजोरी जाणवणे, समतोल राखण्यात अडचण, बद्धकोष्ठता, अतिसार, लघवी करण्यास त्रास होणे. लैंगिक रोग, नपुंसकता, कमी रक्तदाब, हृदयाचे जलद ठोके (टाकीकार्डिया) भरपूर घाम येणे, उलट्या, मळमळ चक्कर येणे.



**कारणे**

अल्कोहोलसंबंधित न्यूरोपॅथीची नेमकी कारणे पूर्णपणे उमगलेली नाहीत. तथापि, संशोधकांना आढळून आले आहे, की दीर्घ कालावधीमध्ये जास्त प्रमाणात मद्यपान केल्याने मज्जातंतूंना हानी पोहोचते. त्यामुळे ही समस्या उद्भवते. कुपोषण हेदेखील यामागचे एक कारण आहे. शरीर मज्जासंस्थेसाठी आवश्यक जीवनसत्त्वे आणि पोषक तत्त्वे ज्या प्रकारे शोषून घेते, त्यावर अल्कोहोल परिणाम करू शकते. दीर्घकाळ अल्कोहोल सेवन केल्याने शरीरात ऑक्सिडेटिव्ह तणाव आणि जळजळ होऊ शकते. हे मज्जातंतूंच्या सभोवतालच्या मायलिनच्या नुकसानीशी संबंधित आहे

**उपचार**

* नाल्ट्रेक्सोन, ॲकॅम्प्रोसेट आणि डिसल्फिराम.
* वर्तन थेरपीची मदत
* व्यावसायिक डॉक्टरांची मदत
* मद्यपान सोडण्यास मदत करणाऱ्या गटात सामील व्हा

अल्कोहोल-संबंधित न्यूरोपॅथी टाळण्यासाठी काय करावे?

* पुरुषांनी दररोज दोन पेग तर महिलांनी एक पेगपेक्षा जास्त दारू पिऊ नये.
* अल्कोहोलसंबंधित न्यूरोपॅथीची लक्षणे आढळल्यास अल्कोहोल पिऊ नये.
* मद्यपान सोडू शकत नसल्यास समुपदेशकाची मदत घ्यावी.
* चांगला आणि संतुलित आहार घ्यावा. जीवनसत्त्वे आणि इतर पोषक तत्वांची कमतरता पूर्ण करावी.
* आठवड्यातून किमान १५० मिनिटे व्यायाम करावा.



## हेडफोनचा मेंदूवर वाईट परिणाम

व्याधी विचार
डॉ. रवींद्र सोमाणी

बरेच लोक बहुतेक वेळा हेडफोन घालतात. विशेषतः तरुणांमध्ये ही सवय झपाट्याने वाढत आहे. आजकाल बाहेरचा आवाज येऊ नये, म्हणूनही हेडफोन्सचा वापर झपाट्याने वाढत आहे. हे उपकरण बाहेरील आवाजापासून संरक्षण करत असले, तरी त्याचा मेंदूवर वाईट परिणाम होत आहे.

लंडनच्या 'नॅशनल हेल्थ सर्व्हिसेस' च्या ऑडिओलॉजिस्टने इशारा दिला आहे की हेडफोन्सच्या जास्त वापरामुळे मेंदूच्या तसेच ऐकू येण्याच्या समस्या वाढल्या आहेत. हेडफोन्समुळे होणारी हानी ऐकण्याच्या क्षमतेशी संबंधित नसून मेंदूशी संबंधित असल्याचे आतापर्यंतच्या तपासात समोर आले आहे. जे काही ऐकतो त्यावर प्रक्रिया करण्यात मेंदूला त्रास होतो.

**हेडफोन्समध्ये काय समस्या आहेत?**

तरुणांमधील श्रवण प्रक्रिया विकार या स्थितीला 'ऑडिटरी प्रोसेसिंग डिसऑर्डर' (एपीडी) म्हणतात. मेंदूला शब्द किंवा ध्वनीवर प्रक्रिया करण्यात अडचण येते, तेव्हा असे घडते. 'एपीडी' ही ऐकण्याच्या क्षमतेमधील कमतरता नाही, तर बाह्य आवाजावर प्रक्रिया करण्याच्या मेंदूच्या क्षमतेमध्ये निर्माण होणारी समस्या आहे.

**मेंदूवर काय परिणाम होतो ?**

श्रवण प्रक्रिया विकार असलेल्या लोकांना गोष्टी लवकर समजण्यास त्रास होऊ शकतो. हा विकार सामान्यतः कानात संक्रमण आणि बालपणातील जखमांशी संबंधित आहे. आवाज रद्द करणारे हेडफोन हे त्याचे एक कारण असल्याचे मानले जाते. हे ठरवण्यासाठी मेंदूला एखाद्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करावे लागेल, त्याला आवाज ऐकावा लागेल. पार्श्वभूमीतील आवाज अवरोधित केले असतील, तर मेंदू त्यांना फिल्टर करणे विसरू शकतो. हेडफोन घातल्याने तुम्हाला ऐकायचे आहे तेच तुम्ही ऐकता. वास्तविक, आवाज रद्द करणाऱ्या हेडफोन्सची वारंवारता कमी असते. त्यामुळे कानाचे रिसेप्टर्स उत्तेजित होतात आणि मेंदूला चुकीचे संदेश पाठवू लागतात.

**कान, मेंदूवर परिणाम**

कानापर्यंत कोणताही आवाज पाठवला नाही, तर मेंदू त्याच्या आत येणाऱ्या गोष्टी वाढवून भरपाई करतो. हे न्यूरल मार्ग बदलते. 'नॉईज कॅन्सलेशन टेक्नॉलॉजी' बाह्य आवाज कमी करण्यासाठी काम करते; परंतु काही वेळा हेडफोन्समधून प्रतिध्वनीसारखा आवाज निघतो. तो बराच काळ ऐकला तर कान आणि मेंदूवर परिणाम होऊ शकतो.

**आवश्यकतेपेक्षा जास्त हेडफोन घालण्याचे तोटे**


* चक्कर येणे
* लक्ष केंद्रित करण्यात अडचण
* अस्वस्थता
* कान दुखणे
* झोप न येणे

## दहा ते पंधरा टक्के लोकांमध्ये वंध्यत्व

आरोग्य विशेष
डॉ. रामदास आव्हाड

बिघडलेली जीवनशैली आणि खाण्याच्या सवयी पुरुषांच्या शुक्राणूंची गुणवत्ता खराब करत आहेत. 'इंडियन सोसायटी ऑफ असिस्टेड रिप्रोडक्शन'च्या मते १०-१४ टक्के भारतीय पुरुष आणि स्त्रिया वंध्यत्वाने ग्रस्त आहेत. प्रत्येक १५ भारतीय जोडप्यांपैकी एक या समस्येशी झुंजत आहे.

पुरुषांमध्ये शुक्राणूंचे प्रमाण, त्याची गुणवत्ता आणि शुक्राणूंचे आयुष्य कमी होणे हे याचे कारण आहे. वंध्यत्व असल्यास पुरुष पिता बनू शकत नाही. अशा परिस्थितीत शुक्राणूंची संख्या का कमी होत आहे, ते कमी झाले आहे हे कसे कळणार, असे प्रश्न उपस्थित होतात. शुक्राणूंची संख्या कमी होण्यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे वाईट जीवनशैली. लठ्ठपणा, फास्ट फूड, दारू-सिगारेट, लॅपटॉप मांडीवर घेऊन काम करणे आणि मोबाईल खिशात ठेवणे



**शुक्राणूंची संख्या किती असावी?**

जेरुसलेममधील हिब्रू विद्यापीठातील प्रोफेसर हागाई लेव्हिन म्हणतात की साधारणपणे एका मिलिलिटर वीर्यामध्ये चार कोटींपेक्षा कमी शुक्राणू असणे म्हणजे वंध्यत्वाची समस्या. २०२२ मध्ये त्यांचे एक संशोधन समोर आले. त्यात शुक्राणूंच्या संख्येबाबत जागतिक ट्रेंड स्पष्ट केले गेले. त्यानुसार १९७३ ते २०१८ पर्यंत शुक्राणूंची संख्या वार्षिक १.२ टक्क्यांच्या दराने कमी झाली, जी दहा कोटी ४० लाखांवरून चार कोटी ९० लाख प्रति मिलीलीटर झाली आहे. २०२० पासून या संख्येत वार्षिक २.६ टक्के घट झाली आहे.

**शुक्राणूंची संख्या कशी तपासायची?**

शुक्राणू चाचणी किटद्वारे घरच्या घरी शुक्राणू संख्या तपासता येते. तथापि, हे केवळ शुक्राणूंची संख्या काय आहे हे सांगते. ही चाचणी शुक्राणूंबद्दल जास्त माहिती देऊ शकत नाही. या किटसह दहा मिनिटांमध्ये निकाल उपलब्ध होतात. दोन कोटींपेक्षा जास्त शुक्राणू असतील, तर संबंधित व्यक्ती पिता बनू शकत नाही, असा अर्थ असा नाही. कारण पुरुषांची प्रजननक्षमता इतर अनेक बाबींवरही अवलंबून असते. त्यामुळे शुक्राणूंची चाचणी केवळ लॅब किंवा व्यावसायिकांकडून करून घेणे चांगले.

**शुक्राणूंची संख्या कमी होण्याची चिन्हे**

* शुक्राणूंच्या कमतरतेमुळे अंडकोषातून बाहेर पडणाऱ्या नसांना सूज येऊ शकते.
* काही लैंगिक संक्रमणामुळे शुक्राणूंची संख्या कमी होऊ शकते.
* स्खलन समस्यादेखील शुक्राणूंची संख्या कमी होण्याचे लक्षण असू शकते.
* शारीरिक संबंध ठेवण्याची इच्छा नसणे
* शुक्राणूंची कमी मात्रा * अंडकोषांमध्ये वेदना * वारंवार श्वसन संक्रमण

### आरोग्यचर्चा

## स्थूलपणाकडे डोळेझाक नको

स्थूलपणा ही एक व्याधी आहे. ही समस्या मधुमेह, उच्च रक्तदाबापासून हृदयविकार, कर्करोगासारख्या दुर्धर आजारांना कारणीभूत ठरते. एवढंच नाही तर स्थूलपणा तुमच्या चव घेण्याच्या क्षमतेवरही परिणाम करू शकतो. कोणताही पदार्थ खाताना त्याची चव महत्त्वाची ठरते. म्हणूनच आपण चवीने खातो, असे म्हणतो. पण स्थूलपणा तुम्हाला चवीने खाऊ देणार नाही. कारण या समस्येमुळे तुम्हाला अन्नपदार्थांची चवच कळणार नाही. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. एका नावाजलेल्या वैद्यकीय जर्नलमध्ये हा शोध प्रकाशित झाला आहे. चव घेण्याच्या क्षमतेवर होणारा स्थूलत्वाचा परिणाम जाणून घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी स्थूल उंदरांचा अभ्यास केला. त्यातून त्यांनी काही निष्कर्ष काढले आणि ही धक्कादायक बाब समोर आली.



### दंतारोग्य




## दात घासण्याचा कंटाळा करताय?

तुम्ही रात्री दात घासायचा कंटाळा करता का? एखाद्या दिवशी दात न घासताच न्याहरी करता का? मग ही माहिती तुमच्यासाठी धोक्याचा इशारा देणारी आहे. तोंडाच्या आरोग्याकडे, दातांच्या स्वच्छतेकडे होणारं दुर्लक्ष आपल्याला चांगलंच महागात पडू शकतं. यामुळे यकृताच्या कर्करोगाचा धोका ७५ टक्क्यांनी वाढत असल्याचं तज्ज्ञांनी स्पष्ट केलं आहे. बेलफास्टच्या क्वीन विद्यापीठात यासंबंधीचा एका अभ्यास मध्यंतरीचा केला गेला. निष्कर्षाप्रत येण्याआधी संबंधितांनी इंग्लंडमधील चार लाख ६९ हजार लोकांचा अभ्यास केला होता. त्यामुळे तोंडाच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्यांनी सावध होण्याची गरज आहे, हे ओळखायला हवे.

### नेत्रारोग्य

## मायोपियापासून दूर राहा

संगणक, स्मार्टफोन वा अशा कोणत्याही स्क्रिनकडे सतत डोळे लावून बसण्याच्या चुकीच्या सवयीमुळे अलिकडे नेत्रविकारांमध्ये वाढ होत आहे. डोळे कोरडे होणं, डोळ्यांमधून पाणी येणं, अनपेक्षितपणे चष्मा लागणं अशा समस्या वाढत आहेत. त्यातच मायोपिया या विकाराचं प्रमाणही वाढताना दिसत आहे. हा विकार झालेल्या रुग्णाला फक्त जवळचं दिसतं. एखादी वस्तू खूप जवळ आणल्याशिवाय त्याला दिसत नाही. संगणक, स्मार्टफोनचा अतिवापर मायोपियाला कारणीभूत ठरत आहे. डोळ्यांशी संबंधित व्यायामांनी मायोपियाला आळा घालता येतो. त्यामुळे तुम्हालाही हा त्रास जाणवत असेल तर नेत्रतज्ज्ञांच्या सल्ल्याने डोळ्यांचे व्यायाम करायला सुरूवात करा आणि नेत्रारोग्य जपा.



### नोंद घ्या



## आरोग्य टिकवण्यासाठी...

पचनसंस्थेचं कार्य सुरळीत असेल तर आपलं आरोग्यही उत्तम रहातं. पचनसंस्थेचं कार्य सुधारण्यात काही नैसर्गिक घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. जसे की, मेथीदाण्यांमध्ये पचनशक्ती सुधारण्याची क्षमता असते. तेव्हा पोटाला आराम देण्यासाठी थोडे मेथीदाणे तोंडात टाकून नीट चावून खा. यामुळे पचनासंबंधीच्या तक्रारी दूर होतील. सारखं पोट बिघडण्याची समस्या असणाऱ्यांनी आल्याचं नियमित सेवन करायला हवं. आल्याचा वापर वेगवेगळ्या पद्धतींनी करता येतो. आल्याचा तुकडा चघळला तरी बराच आराम मिळतो. कोरफडीच्या गरामुळेही पोटाच्या तक्रारी दूर होतात. कोरफडीमुळे शरीरातली विषद्रव्यं निघून जातात आणि पचनशक्ती बळकट होते. त्यामुळे कोरफडीपासून गरापासून केलेले पेय घ्यावे आणि निरोगी राहावे.

# वाघाच्या शिकारीचे रहस्य उलगडले

## विद्युत करंटने शिकार; पाच संशयित ताब्यात



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

नागपूर जिल्ह्यातील खापा वनपरिक्षेत्रात एका तरुण वाघाची क्रूर शिकार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. कोरमेटा क्षेत्रातील सिरोंजी हद्दीतील भनगाळा नाला परिसरात ही घटना घडली. शिकाऱ्यांनी लोखंडी तार आणि बांबू खुंट्यांचा वापर करून विद्युत करंटद्वारे वाघाची शिकार केली.

वनविभागाने या प्रकरणी पाच संशयितांना ताब्यात घेतले आहे. तीन ते साडेतीन वर्षे वयाच्या या वाघाचे दात, मिशा आणि पंजे शिकाऱ्यांनी नेल्याचे तपासात समोर आले आहे. या शिकारीमागे दोन कारणे समोर येत आहेत. एक म्हणजे अंधश्रद्धेतून जादूटोणा करण्यासाठी वाघाची शिकार केली असावी, तर दुसरी शक्यता अशी की होळीसाठी रानडुक्कर किंवा हरणाच्या शिकारीसाठी लावलेल्या सापळ्यात वाघ अडकला असावा.

वनविभागाचे एक विशेष पथक मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील चाकारा, सारदुनी, तोरणी, चौरेफाटा आणि राघादेवी या आदिवासी गावांमध्ये तपास करत आहे. या भागातील आदिवासी टोळ्या प्रथम जादूटोण्यासाठी आणि नंतर सवयीने वन्यप्राण्यांची शिकार करत असल्याचे सूत्रांनी सांगितले. वनविभागाने या भागातील अनेक कुख्यात गुन्हेगारांची चौकशी केली असून, त्यापैकी काहींना सोडून देण्यात आले आहे.

सहायक वनसंरक्षक व्ही. सी. गंगावणे आणि खापाचे वनपरिक्षेत्र अधिकारी एस. जी. आठवले यांच्या नेतृत्वाखाली या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

# बाहेरून आलेल्या लोकांनी दंगल घडवली

## आ. प्रवीण दटकेंचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :



नागपूर शहरात सोमवारी दुपारी विश्व हिंदू परिषदेच्या आंदोलनानंतर सायंकाळी दोन गटात तुफान राडा झाला. दगडफेकीसह जाळपोळीची घटना घडली. पोलिसांकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. दरम्यान, बाहेरून आलेल्या लोकांनी ही दंगल घडवल्याचा आरोप नागपूर मध्यचे आमदार प्रवीण दटके यांनी केला आहे.

प्रविण दटके म्हणाले की, बाहेरुन येणाऱ्या नागरिकांनी दगडफेक केली आहे. गाड्या पेटवल्या आहेत. अग्निशमन दल आग विझविण्यासाठी आले असता त्यांच्या कर्मचाऱ्यांना मारहाण झाली अशी माझी माहिती आहे. माझ्याकडे १५० च्यावर व्हिडिओ आहेत, असा दावा प्रवीण दटके यांनी केला आहे.

बाहेरून येणाऱ्या लोकांनी ज्या सामान्य लोकांची घरे पेटवली. त्यामध्ये दुरुपकर परिवार, पेशणे परिवार, घाटेंचे परिवार, शिर्केंचे परिवार आहेत. टिपून टिपून त्यांनी घरांवर दगडफेक केली आहे, अशी माहिती आहे. सकाळचे आंदोलन झाल्यानंतर पोलिसांनी मध्यस्थी भूमिका निभावली होती. परंतु, बाहेरील वस्त्यांमधील लोकांनी येऊन महाल परिसरात, बडकस चौक परिसरात सामान्य नागरिकांना त्रास देणे, अशी विदारक स्थिती आहे.

सकाळी परिस्थिती वेगळी होती. पण नंतर प्लॅनिंग करून बाहेरचे लोक येऊन ही दगडफेक आणि जाळपोळ केली आहे. वस्त्यांमधील लोकांनी ती केली नाही, असे दोन्ही गटाच्या लोकांचे म्हणणे आहे. आता दोन्ही बाजुंचे लोक गल्लीच्या तोंडावर उभे असून दंगलखोर लोकांना पोलिसांच्या हवाली करत आहेत, असे आमदार प्रवीण दटके यांनी सांगितले.





### मंत्र्याच्या बेताल वक्तव्यामुळे हे घडले - वडेट्टीवार




नागपूर हे अतिशय शांत शहर असताना त्याला सत्ताधाऱ्यांच्या समर्थक संघटनांनी गालबोट लावलेले आहे. हे सगळे मंत्रिमंडळातील बेताल वक्तव्य करणाऱ्या मंत्र्यांमुळे झाले आहे, असे विजय वडेट्टीवार म्हणाले. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी तात्काळ या मंत्र्याची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. जाणून बुजून दोन समाजात द्वेष पसरवणे, भांडण लावणे हे उद्योग केले जात आहेत आणि हे सत्ताधारी करत आहेत. नागपूरकरांनी शांतता बाळगावी, कोणताही गैरप्रकार होऊ नये याची दक्षता घ्यावी, असे आवाहन वडेट्टीवार यांनी केले आहे.

### दोन्ही समाजाने शांतता राखावी अबू आझमी

नागपूर हिंसाचारावर समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. नागपुरात कधीही जातीय दंगली झाल्या नाहीत, पण तिथे दंगल झाली. देशाला पुढे घेऊन जायचे असेल तर आपल्यात भांडणे होऊ नयेत, सर्वांनी शांतता राखावी असे आवाहन अबू आझमी यांनी केले.

### गृह विभागाचे अपयश - प्रदेशाध्यक्ष सपकाळ



नागपूर शहरात दगडफेकीची घटना अनावश्यक व अत्यंत दुर्दैवी आहे. नागपूरकरांनी शांतता राखावी अफवांवर विश्वास ठेवू नये अशी विनंती मी सर्व नागपूरवासियांना करतो, असे आवाहन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

नागपूर शहरात सर्व धर्मीय लोक अत्यंत गुण्यागोविंदाने व आनंदाने रहात आहेत. नागपूर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे शहर आहे. या शहरात एवढ्या प्रमाणात तणाव निर्माण होतो दगडफेक, जाळपोळ होते हे गृह विभागाचे अपयश आहे, अशी टीका त्यांनी केली.

गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्री जाणिवपूर्वक प्रक्षोभक वक्तव्ये करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत होते. त्यांच्या प्रयत्नांना नागपूरमध्ये यश आले आहे असे दिसते.

राज्यासमोर अनेक ज्वलंत प्रश्न आहेत. महागाई, बेरोजगारी, शेतीमालाला भाव नाही सरकारने दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पूर्ण केले नाही लाडक्या बहिणींना वाढीव रक्कम मिळाली नाही, मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या सुरु आहेत. यावरून दुसरीकडे लक्ष वळविण्यासाठी सत्ताधारी सातत्याने प्रक्षोभक वक्तव्ये करत होते त्याचा हा परिपाक आहे, असेही सपकाळ म्हणाले.

नागपूरात कधीही दंगल झाली नव्हती रामनवमीला हिंदू मुस्लीम एकत्रीतपणे रथ ओढतात ताजुद्दीन बाबाच्या दर्ग्यात मुस्लिमांपेक्षा जास्त हिंदू दर्शनाला जातात राजकीय फायद्यासाठी नागपूर पेटवण्याचा डाव ओळखावा, असे ते म्हणाले.


# हिंसाचारात नेहमीचे ओळखीचे चेहरे?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

नागपूरमधील हिंसाचारामागे बाहेरच्या व्यक्ती असल्याचा आरोप केला जात असतानाच शिवसेना खासदार नितीन राऊत यांनी हा आरोप फेटाळला आहे.

नागपूर मध्ये दिसत असलेले चेहरे हे देवेंद्र फडणवीस यांच्या ओळखीचेच असल्याचा आरोप त्यांनी केला. नागपूर मध्ये हिंसाचार करणारे नागपूर मधीलच होते. हिंदूंवर मुद्दाम हल्ले करून हिंदूंना भडकवण्याचे काम केले जात असल्याचा आरोप देखील राऊत यांनी केला आहे.

हिंदूला भडकवण्यासाठी आधी हिंदूंवर हल्ले केले जातात, हा एक नवीन पॅटर्न तयार केला गेला आहे. नागपूर किंवा मुंबईमध्ये अशा प्रकारे काम करण्याची कोणाची हिंमत आहे? हा एक दंगलीचा नवीन पॅटर्न निर्माण झाला आहे.



आधी हिंदूंच्या डोक्यामध्ये भय निर्माण करायचे, त्यांच्यावरती हल्ले करायचे आणि मग त्यांना दंगलीसाठी प्रवृत्त करायचे. त्यानंतर राज्यात आणि देशात दंगली पेटवायच्या आणि त्यानंतर निवडणुकीला सामोरे जायचे हा नवीन पॅटर्न असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे.

हल्ले करणारे कोण आहेत? त्यांना कोणाची प्रेरणा आहे? राज्यात दंगली का घडवत आहात? हा महाराष्ट्रातील संशोधनाचा विषय असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. होळीला देखील यांनी वातावरण खराब केले असल्याचा आरोप राऊत यांनी केला.

# सेन्सॉर बोर्डाकडून दलितांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न

## चल हल्ला बोल चित्रपट प्रदर्शित करण्याची मागणी

### आ. डॉ. नितीन राऊत यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

दलित पँथर चळवळीचे संस्थापक, क्रांतिकारी कवी आणि पद्मश्री पुरस्कार विजेते नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित ह्यचल हल्ला बोलह्व या चित्रपटाला सेन्सॉर बोडार्ने परवानगी नाकारून दलितांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप राज्याचे माजी मंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. नितीन राऊत यांनी आज विधानसभेत केला.

या चित्रपटाला कोणतीही कात्री न लावता तात्काळ प्रदर्शित करण्याची मागणी त्यांनी सभागृहात केली. डॉ. राऊत म्हणाले, ह्वलोकांचा सिनेमाह्व या चळवळीच्या माध्यमातून लेखक आणि दिग्दर्शक महेश बनसोडे यांनी लोकवर्गणीतून हा चित्रपट निर्माण केला आहे.

गोलपीठा या प्रसिद्ध काव्यसंग्रहातील काही कविता चित्रपटात वापरण्यात आल्या आहेत. दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, अल्पसंख्यांक, मुस्लिम, शेतकरी आणि महिलांवरील अन्यायाच्या विरोधात उभारलेल्या चळवळीची भूमिका या चित्रपटातून प्रभावीपणे मांडण्यात आली आहे.

चल हल्ला बोलह्व चित्रपट १ जुलै २०२४ रोजी सेन्सॉर बोर्डाकडे सबमिट करण्यात आला होता. तो ६ डिसेंबर २०२४ रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र सेन्सॉर बोर्डाच्या आक्षेपांमुळे प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलावी लागली. चित्रपट सध्या सिनेमा रिव्हायझिंग कमिटीकडे असून त्याची सर्व फीही भरली आहे, अशी माहिती डॉ. राऊत यांनी दिली.

डॉ. राऊत म्हणाले, आश्चर्याची गोष्ट म्हणजे सेन्सॉर बोडार्चे अधिकारी रेवणकर आणि सय्यद रबी हश्मी यांनी चित्रपट निर्मात्यांना दिलेल्या नोटीसमध्ये नामदेव ढसाळ कोण? असा अजब प्रश्न विचारला आहे. हे अतिशय लाजीरवाणं आहे.

डॉ. राऊत यांनी विधानसभेत जोरदार आवाज उठवत सांगितले की, नामदेव ढसाळ हे केवळ कवी नव्हते, तर दलित पँथर चळवळीचे संस्थापक, सामाजिक क्रांतीचे प्रणेते होते. त्यांना १९९९ मध्ये पद्मश्री आणि २००४ मध्ये साहित्य अकादमीचा जीवनगौरव पुरस्कार मिळाला आहे. अशा महान व्यक्तिमत्त्वावर आधारित चित्रपटाची अडवणूक म्हणजे दलितांचा आवाज दाबण्याचा कट आहे.



सेन्सॉर बोर्डाचे अधिकारी दलित साहित्य आणि विद्रोही मराठी साहित्यातील महत्त्व जाणत नसतील तर अशा अधिकाऱ्यांना त्या पदावर राहण्याचा काडीमात्र अधिकार नाही, असा रोष व्यक्त करत डॉ. राऊत यांनी विधानसभेत थेट या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली.

डॉ. राऊत म्हणाले, सेन्सॉर बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी कोण ढसाळ? असे विचारणे म्हणजे थेट पद्मश्री नामदेव ढसाळ यांची अवहेलना आहे. ही केवळ एका व्यक्तीची नव्हे, तर संपूर्ण दलित समाजाची अवहेलना आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करावी.

या संपूर्ण प्रकरणावरून डॉ. नितीन राऊत यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, चल हल्ला बोल या चित्रपटाला कोणतीही कात्री न लावता तात्काळ प्रदर्शनास परवानगी द्यावी. हे केवळ अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण आहे, तर दलित, आदिवासी, शोषित, पीडित यांच्या आवाजाला न्याय देण्याचा प्रश्न आहे.

: मुलखावेगळी माणस :

# नारळाच्या झावळ्यापासून सुंदर कलाकृती

प्रत्येक व्यक्तीला छंद असतो, कुणाला दुर्मिळ फोटो संग्रहित करण्याचा, कुणाला ऐतिहासिक नाण्यांचा तर कुणाला प्रसिद्ध व्यक्तींच्या स्वाक्षरी जपण्याचा! पण कुडाळ तालुक्यातील आंदुर्ले गावात राहणाऱ्या अनिल परब यांना वेगळाच छंद आहे, तो म्हणजे नारळाच्या झावळ्यापासून विविध कलाकुसरीच्या वस्तू बनवून त्यांची जपणूक करण्याचा! नारळाच्या झावळ्यापासून टोपी, टोपल्या, मखर तर सोडणांपासून पक्ष्यांच्या कलाकृती अनिल परब बनवितात. त्यांची कला आता सिंधुदुर्ग जिल्ह्याबाहेरही पोहोचली आहे.

अगदी सामान्य कुटुंबातले असलेले अनिल परब यांची नारळाची बाग आहे. नारळाच्या झावळ्या, करवंटी, सोडण या प्रामुख्याने टाकाऊ घटकांमध्ये येतात. परंतु, याच झावळ्या, सोडणपासून अनिल परब यांनी आपला छंद जोपासत वेगवेगळ्या कलाकृती बनविल्यात. यामध्ये टोपी, पक्षी, टोपल्या, मखर, कंदील, गणपती सणात डेकोरेशन आदींचा समावेश आहे. अनिल परब यांनी झावळ्यापासून बनविलेल्या टोप्या अगदी अमेरिकेत पोहचल्या आहेत. या टोप्या अगदी टिकाऊ असून सहज ५ ते ६ महिने टिकतात.

अनिल परब यांच्या कलाकृती सोशल मीडियावर सुद्धा व्हायरल झाल्याने अनेक पर्यटक, जिल्ह्यातील नागरिक आंदुर्ले या गावी येऊन या वस्तू विकतही घेतात. तर अनिल परब या वस्तू अनेक जणांना कोणताही मोबदला न घेता देतात. म्हणजेच अनिल परब यांचा हा छंद त्यांचे आर्थिक साधनही बनले आहे.

अनिल परब यांना कलाकुसरीच्या वस्तू बनविण्याचा छंद होता. मात्र, हा छंद मर्यादित राहिला होता. त्यांच्या आंदुर्ले या गावी ४ ते ५ वर्षापूर्वी नारळ प्रशिक्षण होते. अनिल परब या प्रशिक्षणासाठी गेले होते. पण प्रशिक्षणासाठी वय





लोकमानस

मर्यादा असल्याने त्यांना त्यात पूर्णवेळ सहभाग घेता आला नाही. यातील काही मोजके प्रशिक्षण त्यांना मिळाले. त्यानंतर अनिल परब यांनी आपली या छंदाला वेगळी वाट निर्माण करून देताना नारळाच्या झावळ्यापासून वेगवेगळ्या कलाकुसरी बनविल्या. अनिल परब यांनी झावळ्यापासून पंढरीचा पांडुरंग सुद्धा साकारला आहे.

काही दिवसांपूर्वी परब यांचा झावळ्यापासून वस्तू बनविण्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यातूनच अमेरिकेत राहणारे पण मूळ भारतीय असलेले पर्यटक अनिल परब यांच्या निवासस्थानी आले. त्यांनी अनिल परब यांच्या कडील वस्तू खरेदी करून अमेरिकेत नेल्या. रत्नागिरी, गोवा, मुंबई, बेळगाव येथील काही नागरिकांना अनिल परब यांच्याविषयी माहिती समजली. त्यांनी सुद्धा अनिल परब यांच्या घरी येऊन त्या खरेदी केल्या.अनेक लोक त्यांच्या घरी येऊन त्या विकत घेतात. पण अनिल परब हे या वस्तू कोणतेही पैसे न घेता देतात. पण काही हौसी लोक अनिल परब यांना यांचा आर्थिक मोबदला देतात.

माडाच्या झावळ्यापासून या वस्तू बनविणे माझा छंद आहे. मी या वस्तू नागरिकांना निःशुल्क देतो. पण काही नागरिक पैसे देतात. एकूणच,नैसर्गिक नारळाच्या झावळ्या पासून सुंदर कलाकृती बनविणारा अनिल परब सारखा अवलिया हा मुलखावेगळा माणूसच ठरतो. ■ ■

: वाद संवाद :

## कबरीचा वाद हे राजकारण आहे का?

**विजय मोदड, इतिहास अभ्यासक**

एक आठवड्यापूर्वी समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी काहीही कारण नसताना इतिहासाची मढी उकरून विनाकारण औरंगजेबाचे उद्दातीकरण आपल्या एका भाषणात केले,आणि तिथूनच खऱ्या अर्थाने मग औरंगजेबाचा विषय त्याच्या अहिल्यानगरात असलेल्या कबरीपर्यंत पोहचला. अनेक हिंदुत्ववादी संघटना भडकल्या आणि महाराष्ट्रातून औरंगजेबाची कंबर हटविण्याची मागणी मागील काही दिवसापासून जोर धरू लागली आहे. मात्र या संघटनापाठी विविध राजकीय पक्षांचे लोक आहेत आणि तेच आपल्या स्वार्थासाठी लोकांची माथी भडकविण्याचे पाप करत आहेत. वास्तविक पाहता शिवकालीन इतिहासाला आता ३५० वर्ष उलटून गेली आहेत,मात्र याच इतिहासातीळ मढी उकरून हिंदू मुस्लिम वाद या राजकारण्यांना घडवायचा आहे.

**वैशाली जाधव, शिवसैनिक**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आहेत आणि त्यांच्या सारख्या निधड्या छातीच्या योध्यानेच जुलमी मोगलांच्या राजवटीतून स्वकीयांची सुटका करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आहे. तत्कालीन ज्या ज्या मुघलांनी मराठ्यांवर ,त्यांच्या स्त्रियांवर अन्याय अत्याचार केले अशा मोघलांमध्ये औरंगजेब हा सर्वात क्रूर आणि पाशवी असा मुघल होता. त्यांनी शंभुराजांना देखील कैदेत टाकून धर्म बदलण्यासाठी त्यांचा अनन्वित छळ केला हे इतिहासात नमूद आहे. असा जुलमी औरंगजेबाची कंबर महाराष्टरच्या पवित्र भूमीत नकोच हीच सर्व हिंदू बांधवांची मागणी आहे आणि ती अतिशय योग्य आहे असे मला वाटते. ■ ■ ■

## जीप इंडियाची एक्सक्लुझिव्ह कंपास सँडस्टॉर्म एडिशन



जीप इंडिया जीप कंपास सँडस्टॉर्म एडिशन लाँच करून साहसाची भावना पुन्हा जागृत करत आहे, ही एक अनोखी आणि विशेष ॲक्सेसरी पॅकेज आहे जी मजबूतपणा आणि प्रीमियम शैलीचे मिश्रण शोधणाऱ्यांसाठी डिझाइन केलेली आहे. कंपासचे एक धाडसी अर्थ लावणारा, हा मर्यादित-आवृत्ती प्रकार उत्साही लोकांसाठी तयार केला आहे ज्यांना त्यांची जीप रस्त्यावर आणि बाहेर दोन्ही ठिकाणी वेगळी दिसावी असे वाटते.

कंपास सँडस्टॉर्म एडिशन आयकॉनिक जीप स्टाइलिंगला पुढील स्तरावर घेऊन जाते, हूड आणि बाजूंवर कस्टम सँडस्टॉर्म-थीम असलेले डेकल्स तिची आकर्षक उपस्थिती वाढवतात. यात अतिरिक्त आरामासाठी प्रीमियम सीट कव्हर्स आणि प्रोग्रामेबल ॲम्बियंट लाइटिंग, वाढीव सुरक्षिततेसाठी फ्रंट आणि रीअर डॅश कॅम्स, कार्पेट आणि कार्गो मॅट्स आणि मॉडेलची विशिष्टता दर्शविणारा एक खास सँडस्टॉर्म बॅज यासारख्या अत्याधुनिक तपशीलांचा समावेश आहे. जीप इंडियाचे ब्रँड डायरेक्टर कुमार प्रियेश म्हणाले, जीप कंपास सँडस्टॉर्म एडिशन ही खास ऑफरसह जीप उत्साहींना उत्तेजित करण्याची आमची वचनबद्धता कायम ठेवते. ही आवृत्ती साहसी भावनेकडे आकर्षित झालेल्या आणि त्यांच्या शैलीची अद्वितीय भावना प्रतिबिंबित करणारे वाहन शोधणाऱ्या ग्राहकांशी पूर्णपणे जुळते. त्याच्या मजबूत डिझाइन सुधारणा, प्रीमियम ॲक्सेसरीज आणि कस्टमायझेशन पर्यायांसह, सँडस्टॉर्म एडिशन जीपच्या मालकीचे आकर्षण वाढवते. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

